



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक ७४ * नांदेड * गुरूवार, दि. १९ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## शुद्धलेखनाच्या नावाखाली शेतकऱ्यांचे उतारेच बदलले, महसूल विभागात मोठा घोटाळा, दीड लाख शेतकऱ्यांची फसवणूक

**मुंबई (प्रतिनिधी)–** शुद्धलेखनात बदल करण्याच्या नियमाखाली सातबारा उताऱ्यात बदल केल्याची बाब समोर आली आहे. आतापर्यंतच्या इतिहासात महसूल खात्यात झालेला हा सगळ्यात मोठा घोटाळा असल्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे सांगितले. तसेच महसूल विभागाच्या कलम १५५ अंतर्गत अधिकाऱ्यांनी एक ते दीड लाख शेतकऱ्यांना फसवल्याची कबुली दिली. सभागृह संपायच्या आत दोषींवर कारवाई करण्याचं आश्वासन चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलं.

दरम्यान, यावेळी ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी प्रश्न उपस्थित केले. अनिल परब म्हणाले, महसूल कायद्याने जे अधिकार दिले जातात त्यामध्ये विविध कलमे देण्यात आली आहेत. ज्यामध्ये अधिकाऱ्यांना त्याचे अधिकार मिळतात. अधिकारी बऱ्याच वेळा चुका दुरुस्त करण्यासाठी कलमांचा वापर करतात. त्यामुळे फेरफार करतात हेच आणि दुरुस्ती देखील हेच करतात. यामुळे ज्यावेळी



शेतकरी फेरफार दुरुस्तीसाठी जातो त्यावेळी त्याला हे अधिकारी रखडतात.

मी या खात्याचा मंत्री झालो तेव्हा अनेक तक्रारी माझ्याकडे आल्या. कलम१५५ चा दुरुपयोग केला जात आहे. शुद्धलेखनात झालेली चूक सुधारणे हेच कामं तहसीलदारांचं आहे. ध चा मा... करत कोट्यावधी शासनाचा निधी वापर केला गेला. मालकी हक्काचा ही वापर केला गेला आहे.

आता आम्ही सगळीकडे तपास करण्याचे आदेश दिले आहेत. महसूल खात्यात आतापर्यंत सर्वात मोठी अनियमितता झाली आहे. १५५ चा दुरुपयोग करून एखाद्याला मोठ्या माणसाने गरिबाला फसवलं आहे. छोट्या माणसाला हाती घेऊन हे एक मोठं काम केलं आहे.

प्रवीण घेडा यांचा रिपोर्ट आला आहे. महसूल खातं पूर्ण खाली होऊन जाईल. जानेवारीमध्ये हा अहवाल आला. ज्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. असं राज्यात किती झालं आहे आणि या करिता केवळ कारवाई नाही तर... सर्व रिवोक करा असे आदेश जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.

जेवढा १५५ चा दुरुपयोग केला ते दुरुस्त करा. पुढच्या ७ दिवसात कारवाई करू आणि पुढच्या अधिवेशनात संपूर्ण चित्र सभागृहात दिसेल आणि कितीही मोठा अधिकारी असेल त्याच्यावरही कारवाई होईल. मी महसूल मंत्री आहे. मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा केली... या अधिकाऱ्यांचं करायचं काय, याबाबत पुढील काही दिवसात कारवाई होईल, असं बावनकुळे म्हणाले.

## पंतप्रधानांनी केली देवेगौडा, खरगे, शरद पवारांची प्रशंसा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पंतप्रधान मोदींनी राज्यसभेत निवृत्त होणाऱ्या ३७ खासदारांसाठी निरोप समारंभाचे भाषण दिले. ते म्हणाले, या सभागृहात निरोप घेणारे सर्व सदस्य, ज्यात काहींना सभागृहातच निरोप दिला जात आहे, हे या सन्माननीय सदस्यांच्या योगदानाची साक्ष आहेत. देवेगौडा, खरगे आणि शरद पवार यांनी आपल्या आयुष्यातील अर्ध्याहून अधिक काळ संसदीय कामकाजात घालवला आहे. ते म्हणाले की, सदस्यांनी अशा व्यापक अनुभवांमधून शिकले पाहिजे. समाजात असलेल्या जबाबदाऱ्यांप्रति समर्पित राहणे हा एक धडा आहे. मी त्यांच्या योगदानाची प्रशंसा करतो. इतका मोठा कार्यकाळ लहान नसतो.

पंतप्रधान मोदी म्हणाले, आपले उपसभापती हरिवंशजी यांना या सभागृहात दीर्घकाळ सेवा करण्याची संधी मिळाली आहे. ते मृदुभाषी आहेत. संकटकाळात सूत्रे हाती घेण्याची जबाबदारी त्यांच्यावर येते. त्यांना प्रचंड अनुभव आहे आणि ते सर्वांना चांगले ओळखतात. पण त्यांचेही योगदान आहे. माझ्या लक्षात आले आहे की, जेव्हा ते सभागृहात नसतात, तेव्हा ते नेहमी देशातील तरुणांना भेटत असतात. ते केवळ एक मेहनती व्यक्तीच नाहीत, तर त्यांनी भारताच्या कानाकोपऱ्यात कामही केले आहे. आम्ही ऐकायचो की सभागृहात विनोदाला नेहमीच वाव असतो. माध्यमविश्व असे आहे की प्रत्येकजण जागरूक असतो. मला खात्री आहे की ते अशा उपहासाचा वापर करत राहतील, असे ते म्हणाले.

## नाशिकच्या 'कॅप्टन' मांत्रिकाला अटक; पोलिसांना सापडले ५८ व्हिडीओ, नामांकित महिला सेलिब्रिटी, अधिकाऱ्यांचा समावेश

**नाशिक (प्रतिनिधी)–** बलात्काराच्या गंभीर गुन्ह्यातील आरोपी अशोक खरात उर्फ 'स्वघोषित कॅप्टन' याला नाशिक क्राइम ब्रांच युनिट १ ने अटक केली आहे. संबंधित आरोपीविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. तपासादरम्यान पोलिसांनी तब्बल ५८ व्हिडिओ जप्त केल्याची माहिती समोर आली आहे. या व्हिडिओंमध्ये काही नामांकित महिला व सेलिब्रिटी संबंधित असल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. पोलिसांकडून जप्त करण्यात आलेल्या व्हिडिओंची सखोल तपासणी सुरू असून, त्यामधून आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास नाशिक क्राइम ब्रांच युनिट १ करीत आहे.

नाशिकमधील बहुचर्चित खरात उर्फ कॅप्टन या भोंदूगिरी करणाऱ्या मांत्रिकाला क्राइम ब्रांच युनिट एकने अटक केली असून या मांत्रिकाच्या विरोधात एका महिलेने तक्रार दिली होती. धमकी देऊन आणि गुंगीचे औषध देऊन एका महिलेवर बलात्कार केलाचा गुन्हा नाशिकच्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात दाखल आहे. या गुन्ह्याच्या अनुषंगाने खरात उर्फ कॅप्टन याला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांकडून ५८ व्हिडिओ जप्त केल्याचे सांगत या व्हिडिओमध्ये नामांकित महिला तसेच सेलिब्रिटी वरिष्ठ अधिकारी आणि काही राजकीय नेत्यांची माहिती असल्यास देखील माहिती मिळत आहे. पोलिसांकडून या व्हिडिओची सखोल तपासणी सुरू असून यात अनेक धक्कादायक बाबींचा समावेश असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात भोंदूगिरी करणाऱ्या खरात उर्फ कॅप्टन यांची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केली आहे.

नाशिकमध्ये सरकारवाडा पोलिसांत संशयित अशोक खरात याच्याविरुद्ध अत्याचाराचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ३५ वर्षीय महिलेवर अत्याचार केल्याच्या आरोपाखाली अशोक खरात उर्फ 'स्वघोषित कॅप्टन' याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. (बुधवार १८ मार्च) खरात याला पहाटे ३ वाजताच्या सुमारास गुन्हे शाखेकडून ताब्यात घेण्यात आले. यासंदर्भात सध्या अधिक चौकशी सुरु आहे. धक्कादायक म्हणजे त्याच्याकडून जप्त केलेल्या पेन ड्राईव्हमध्ये ५८ आक्षेपार्ह व्हिडीओ असून, त्याची सत्यता पडताळण्यात येत आहे.




गोदातीर समाचार

**आज गुढीपाडवा**

मराठी नववर्ष तथा गुढीपाडव्यानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**–संपादक**

**सुट्टीची सूचना**

आज गुढीपाडवानिमित्त कार्यालयास सुट्टी असल्याने उद्या दि. २० मार्च २०२६ चा गोदातीर समाचारचा अंक प्रकाशित होणार नाही. वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी याची नोंद घ्यावी.

**– व्यवस्थापक**


## इराण युद्धावरून ट्रम्प प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्याचा राजीनामा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अमेरिकेच्या राष्ट्रीय दहशतवादी विरोधी केंद्राचे संचालक जो केंट यांनी अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्यांवर टीका करत आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. यानंतर आता व्हाईट हाऊसने बुधवारी या प्रकरणात सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. केंट हे इराणवरील लष्करी कारवायांसंबंधी निर्णय प्रक्रियेचा भाग नव्हते, असे व्हाईट हाऊसने म्हटले आहे. तसेच प्रशासनातील माहिती लीक करणाऱ्या संशयित व्यक्तीचा शोध घेण्यासाठी अंतर्गत चौकशी केली जात असल्याचे समोर आले आहे.

## एकनाथ शिंदेंपाठोपाठ फडणवीसांच्या दिल्ली दौऱ्यामुळे पुन्हा 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नुकत्याच झालेल्या दिल्ली दौऱ्याने महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या उलथापालथीचे संकेत दिले आहेत. शिंदे यांच्या दिल्ली दौऱ्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही दिल्ली दौरा केल्याने वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे.

या भेटीनंतर उद्धव ठाकरे गटातील काही खासदार शिंदे गटाच्या संपर्कात असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. ठाकरेंच्या खासदारांशी शिंदेंच्या नेत्यांनी अगोदरच संपर्क केल्याची माहिती विश्वसनीय नेत्यांनी दिली आहे. परंतु डी-डे पूर्वी त्याविषयीची अनावश्यक चर्चा टाळण्याच्या सूचना देण्यात आल्याचीही सूत्रांची माहिती आहे.

राजधानी दिल्लीत एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्यानंतर ऑपरेशन टायगरच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. त्यातच एकनाथ शिंदे यांच्या दौऱ्यानंतर मंत्री उदय सामंत, माजी खासदार राहुल शेवाळे राजधानी दिल्ली दौऱ्यावर आहेत. मंत्री उदय सामंत, माजी खासदार राहुल शेवाळे हे राजधानी दिल्लीत पक्ष संघटनेतील बदला संदर्भात चर्चा करण्यासाठी आले आहेत. अशी माहिती राहुल शेवाळे यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीत केवळ राज्यातील विकासकामांवरच नाही, तर आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय रणनीतीवरही सविस्तर चर्चा झाल्याचे समजते. लोकसभा खासदारांची संख्या वाढवण्यासाठी शिंदे गटाने विशेष नियोजन आखले असून, ठाकरे गटाला खिंडार पाडण्यासाठी योग्य मुहूर्ताची प्रतीक्षा असल्याचे बोलले जात आहे. या घडामोडींमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं असून, आपल्या खासदारांना रोखण्यासाठी काय हालचाली होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## राज्यातील सर्व जमिनींच्या फेरफार नोंदीची होणार तपासणी

**मुंबई (प्रतिनिधी)–** महसूल कायद्यातील कलम १५५ चा गैरवापर करून जमिनीच्या नोंदीत फेरफार करणाऱ्या आणि सर्वसामान्यांच्या जमिनी हडपणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर अतिशय कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच राज्यात असा प्रकार आणखी कुठे झाला याची सर्वंकष चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

सध्या पुणे विभागातीलच गैरव्यवहार पुढे आला असून, महाराष्ट्रातील अशा नोंदी तपासण्याचे आदेश सर्व विभागीय आयुक्तांना दिले आहेत. त्यानंतर हा प्रकार किती मोठा आहे, याची कल्पना येईल. पुणे विभागातील या अतिगंभीर प्रकरणांवर पुढील सात दिवसांत प्राथमिक कारवाई केली जाईल. हा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर सुरू असलेल्या अधिवेशनाचे कामकाज संपण्यापूर्वीच यावर केलेल्या कारवाईचा सविस्तर 'क्शन टेकन रिपोर्ट' (एटीआर) सभागृहासमोर ठेवला जाईल, असे आश्वासनही महसूलमंत्री बावनकुळे यांनी सभागृहात दिले.

## पुन्हा राज्यात वादळी पावसासह गारपिटीचा इशारा

### विदर्भ-मराठवाड्यावर अवकाळीचे सावट

**पुणे (प्रतिनिधी)–** राज्यात उन्हाचा चटका जाणवत असतानाच आता हवामानात पुन्हा एकदा मोठे बदल झाले आहेत. हवामानतज्ज्ञ सानप यांनी दिलेल्या हवामान अंदाजानुसार, पुढील दोन दिवस विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागांमध्ये अवकाळी पाऊस आणि गारपीट होण्याची शक्यता आहे.

सध्या विदर्भ आणि मराठवाड्याच्या बहुतांश भागांत मोठ्या प्रमाणावर ढगांची गर्दी पाहायला मिळत आहे. मागील दोन दिवसांपासून राज्याच्या अनेक भागांत तापमानाचा पारा घसरला असून, विशेषतः सायंकाळच्या वेळी हवेत सुखद गारवा अनुभवायला मिळत आहे. कडाक्याच्या उन्हापासून नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला असला, तरी अवकाळी पावसाचे संकट मात्र गडद झाले आहे.

हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, ढगाळ हवामानामुळे पुढील ४८ तासांत विजांच्या कडकडाटासह पाऊस पडू शकतो. काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या गारपिटीची देखील शक्यता आहे. मात्र, हा दिलासा अल्पकाळ टिकणारा असून, दोन-तीन दिवसांनंतर वातावरणात पुन्हा बदल होईल आणि तापमानात मोठी वाढ होऊन उन्हाचा कडाका वाढेल, अशी शक्यताही वर्तविण्यात आली आहे.

## पोलिसांचा मेडिकलवर छापा, नशेच्या १६०० गोळ्या जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात गुन्हेगारी कृत्य करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अमली गोळ्यांची छुप्या पद्धतीने विक्री करणाऱ्या मेडिकल स्टोअरवर भाग्यनगर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. राज कॉर्नर भागातील 'जय हनुमान मेडिकल' येथे बनावट ग्राहक पाठवून पोलिसांनी सापळा रचला आणि तब्बल १६०० नशेच्या गोळ्यांचा साठा जप्त केला.

भाग्यनगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक संतोष तांबे यांना गोपनीय माहिती मिळाली होती की, जय हनुमान मेडिकलमध्ये डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या गोळ्यांची विक्री होत आहे. या माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी एक बनावट ग्राहक मेडिकलवर पाठवला. या ग्राहकाने डॉक्टरांची चिठ्ठी नसतानाही १० गोळ्यांची मागणी केली. मेडिकल चालकाने कसलीही विचारपूस न करता प्रेगाबलिन कॅप्सूल्स' या गोळ्या त्याला दिल्या. विक्री होताच सापळा रचलेल्या पोलिसांनी तातडीने धाड टाकून कारवाई केली. यावेळी अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारीही उपस्थित होते. मेडिकलमधून नशेच्या तब्बल १६०० गोळ्या जप्त करण्यात आल्या आहेत. या प्रकरणात भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## महाराष्ट्र मोटार वाहन कर सुधारणा विधेयक एकमताने मंजूर

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०२६ बुधवारी विधिमंडळात एकमताने मंजूर करण्यात आले आहे. राज्यातील पर्यावरण संरक्षण, आर्थिक शिस्त आणि औद्योगिक विकास यांचा समतोल साधण्याच्या दृष्टीने हे विधेयक महत्त्वाचे ठरणार आहे.

या विधेयकाद्वारे वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी जुन्या आणि प्रदूषणकारी वाहनांवरील पर्यावरण करात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. दुचाकी वाहनांसाठी पर्यावरण कर २००० रुपयावरुन ४००० रुपयांवर, पेट्रोल वाहनांसाठी ३००० रुपयांवरुन ६००० रुपयांवर, तर डिझेल वाहनांसाठी ३५०० रुपयांवरुन ७००० रुपये करण्यात आला आहे.

## राष्ट्रवादी उमेदवार देणार नसेल तर सुनेत्रा पवारांविरुद्ध काँग्रेस उमेदवार देईल -वडेट्टीवार

**मुंबई (प्रतिनिधी)–** 'बारामती पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवार देणार नसेल तर काँग्रेस उमेदवारीबाबत विचार करेल, असं विजय वडेट्टीवार म्हणाले. सुप्रिया सुळे यांनी सुनेत्रा पवार यांच्याविरोधात उमेदवार देणार नसल्याचं बोलल्यानंतर वडेट्टीवार यांनी हे मोठे वक्तव्य केलं आहे.

महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी या दोन विधानसभा मतदारसंघात येत्या २३ एप्रिलला मतदान आणि ४ मे रोजी निकाल होणार आहे.

अजित पवार यांच्या निधनाने रिक्त झालेल्या बारामती विधानसभेसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनाच राष्ट्रवादीकडून उमेदवारी दिली जाणार आहे. त्याविरोधात शरद पवारांची राष्ट्रवादी उमेदवार देणार नाही अशी भूमिका खासदार सुप्रिया सुळे यांनी जाहीर केली होती. त्यानंतर आता महाविकास आघाडीतील काँग्रेसच्या भूमिकेने सर्वात मोठा ट्विस्ट आला आहे.




## भाजप आ.राजेश पवार यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे नायगाव न्यायालयाचे आदेश

### न्यायालयाकडून स्टे मिळाल्याने आ. पवार यांना दिलासा

**नांदेड (प्रतिनिधी)–** भावासोबतच्या शेतीच्या वादावरून नायगाव येथील भाजपचे आमदार राजेश पवार, पत्नी पूनम पवार व इतर आठ जणांविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करा, असे आदेश नायगाव प्रथम वर्ग न्यायालयाने दिले आहेत. दरम्यान, याप्रकरणी न्यायालयाकडून स्टे मिळाल्याने आ. पवार यांना दिलासा मिळाला आहे.

नायगावचे भारतीय जनता पार्टीचे आ.राजेश पवार यांचे श्रीराम पवार हे चुलत बंधू आहेत. नायगाव मधील आलूवडगाव येथे पवार कुटुंबियांची जमीन आहे. आ. राजेश पवार यांच्या आईकडून मिळालेली ही शेत जमीन आहे. या शेतीला लागूनच चुलत बंधू श्रीराम गोविंदराव पवार यांची जमीन आहे. त्यांनी पाच वर्षांपूर्वी शेतीमध्ये बांबूची लागवड केली. २४ जून २०२३ रोजी, आ. राजेश पवार, पत्नी पूनम पवार व ८ जणांनी श्रीराम पवार यांना धमकी दिल्याची तक्रार श्रीराम पवारांनी पोलीस ठाणे, तहसीलदार, एसपी, जिल्हाधिकारी यांच्याकडे दिली होती. परंतु तक्रार दाखल करून घेण्यात आली नसल्याने श्रीराम पवार यांनी नायगाव येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांच्याकडे धाव घेऊन खटला दाखल केला. याबाबत नायगाव प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांनी आ.राजेश पवार, पत्नी पूनम पवार व इतर ८ जणांविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

दरम्यान, याप्रकरणावर आ. पवार यांनी न्यायालयात दाद मागितल्यानंतर स्टे (जैसे थे) चा आदेश न्यायालयाकडून मिळाल्याचे समजते.

## गुटखा विरोधी मोहिमेअंतर्गत तिसऱ्या दिवशी १७ जण अटकेत; ५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड परिक्षेत्रात गुटखा विरोधी मोहिमेअंतर्गत तिसऱ्या दिवशी १७ जणांना अटक करून त्यांच्याकडून ५ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. १६ ते ३१ मार्च २०२६ दरम्यान, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांविरुद्ध मोहीम उघडली आहे. सदर मोहिमेच्या तिसऱ्या दिवशी, गुटखा विक्री, साठवणूक व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध आणखी (१५) गुन्हे नोंदवत, या व्यवसायात गुंतलेल्या एकूण (१७) आरोपींना पोलिसांनी गजाआड केले आहे. सदर मोहिमेअंतर्गत, परिक्षेत्रातील नांदेड जिल्ह्यात (७), हिंगोली जिल्ह्यात (१) परभणी जिल्ह्यात (४), तर लातूर जिल्ह्यात (३) अशा एकूण



(१५) कारवाया करण्यात आल्या असून, एकूण (१७) आरोपींकडून एकूण ४ लाख ९६ हजार ६ रुपये किंमतीचा गुटखा व अन्य साहित्य जप्त करण्यात आले आहेत.

परिक्षेत्रात गुटखा व इतर प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांविरुद्ध कठोर कारवाई करण्याच्या अनुषंगाने विशेष मोहीम राबविण्यात येत असून, सदर मोहिमेदरम्यान स्वादिष्ट/सुगंधित तंबाखू, अपमिश्रके युक्त चघळण्याची तंबाखू, स्वादिष्ट/सुगंधित सुपारी, गुटखा, पान मसाला, खर्रा, मावा व तत्सम पदार्थांची साठवण, वितरण व वाहतूक याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३ अन्वये कारवाई करण्यात येत आहे.

उपरोक्त पदार्थांच्या संदर्भात, संबंधिताविरुद्ध कलम १२३ बी.एन.एस. अन्वये करण्यात आलेल्या कारवाईचा खटला हा सत्र न्यायालयात चालणारा असून त्यास दहा वर्षेपर्यंत कारावासासह द्रव्य दंडाची देखील शिक्षा आहे.

आपल्या भागात चालणाऱ्या अवैध व्यवसायांची माहिती पोलिसांपर्यंत पोहोचविणे सोपे व्हावे म्हणून पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने ९१५०१ ००१०० हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली आहे. नागरिकांनी जागरूक होऊन, आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, सदर क्रमांकावर फोन करून अथवा व्हॉट्सअ‍ॅप मेसेजद्वारे पाठवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# डिझेलवरील वाहने बंद होणार, पण...

पेट्रोलियम मंत्रालयाने नेमलेल्या समितीने २०२७ पर्यंत डिझेलवर चालणाऱ्या चारचाकी वाहनांचा वापर बंद करण्याची शिफारस केली आहे. दहा लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये डिझेल चारचाकींचा वापर टप्प्याटप्प्याने कमी करीत तो थांबवावा, असे समितीचा अहवाल सांगतो. वाहने पारंपरिक इंधनाऐवजी इलेक्ट्रिक आणि वायू इंधनाकडे वळावीत, यासाठी ही शिफारस करण्यात आली आहे. महानगरांतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था २०३० पर्यंत मेट्रो आणि इलेक्ट्रिक बस हीच असावी, अशी अतिशय महत्त्वाची शिफारसही समितीने केली आहे. यामागे दोन प्रकारचा विचार केला जाऊ शकतो, कारण यामध्ये काही फायदे आणि काही तोटे संभावतात. पहिली गोष्ट म्हणजे हा निर्णय लागू झाल्यास प्रदूषण खूपच कमी होईल. त्याप्रमाणे इंधनावर जो खर्च संपूर्ण देशामध्ये होतो तोही कमी होईल. यामुळे आपसूकच पेट्रोलसाठी होणारा आपल्या देशाचा खर्च वाचेल आणि तो खर्च आपण इतर योजनांसाठी वापरू शकतो. त्याचप्रमाणे कधी ना कधी डिझेल, पेट्रोल किंवा इतर प्रकारचे समक्ष इंधन संपणारच आहे. त्याला पर्याय शोधणे आवश्यकच होते. अशा प्रकारची भूमिका अमेरिकेने मागच्या पंधरा-वीस वर्षांपूर्वीच घेतलेली आहे. म्हणून त्यांच्याकडे आता पेट्रोल आणि डिझेलवर चालणाऱ्या गाड्यांची संख्या अत्यंत कमी आहे. तसाच प्रकार आपणही करणे गरजेचे होते, पण उशिरा का होईना हा निर्णय झालेला आहे, ही बाब निश्चितच अभिनंदनीय आहे. दुसरी बाब म्हणजे याची अंमलबजावणी पूर्णपणे करणे आणि निर्धारित केलेल्या वेळेमध्ये ते पूर्ण करणे सध्यातरी अवघड वाटते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे डिझेलवरील वाहनं बंद केल्यानंतर त्यांचे रूपांतर एक तर पेट्रोलमध्ये करावे लागेल किंवा इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन द्यावे लागेल. त्यासोबतच सीएनजी आणि हायड्रोजन यासारखे पर्याय उपलब्ध आहेत. परंतु याची सोय आता सर्वत्र झालेली नाही. ज्याप्रमाणे पेट्रोल आणि डिझेलचे पंप सर्वत्र झालेले आहेत तसेच व्यवस्था गॅस आणि इलेक्ट्रिक चार्जिंग करणे देखील गरजेचे आहे. सध्या इलेक्ट्रिक गाड्यांमध्ये एक समस्या मागच्या काही दिवसांपासून दिसून येते आहे, ती म्हणजे अशा गाड्या पेट घेत आहेत. दुचाकी वाहनांमध्ये हे प्रकर्षाने जाणवते आहे. चार चाकी वाहनांमध्ये असा प्रकार आढळून आला नाही. तरी खबरदारी घ्यावीच लागणार आहे. त्याचप्रमाणे जागोजागी इलेक्ट्रिक गाड्यांची चार्जिंग करण्याची व्यवस्था करणे फार महत्त्वाचे आहे. जोपर्यंत ही व्यवस्था होणार नाही तोपर्यंत लोक इलेक्ट्रिक गाड्या घेणारच नाहीत. तसेच अशा गाड्यांची देखभाल आणि दुरुस्ती करण्याची सोय सुद्धा व्हावी लागेल. ती कालांतराने होईलच, पण इलेक्ट्रिक चार्जिंग करण्याची व्यवस्था केवळ बाहेर एखाद्या एजन्सीकडेच असली पाहिजे असं नाही तर प्रत्येकाला आपल्या घराच्या पार्किंगमध्ये असे करता येईल काय, याचा विचार केला पाहिजे. अशा प्रकारची यंत्रणा विद्युत महामंडळाकडून वाहनधारकांना देणे गरजेचे आहे. अशा प्रकारच्या सोयी झाल्यास निश्चितच लोक इलेक्ट्रिक गाड्यांकडे वळतील. यामध्ये आणखी एक चांगली बाब होते की, पेट्रोल किंवा डिझेलवर चालणाऱ्या गाड्या इलेक्ट्रिकवर देखील चालणार आहेत. जेव्हा चार्जिंग संपेल तेव्हा पेट्रोल किंवा डिझेलचा उपयोग करता येईल. अशा प्रकारची सोय सध्या दुचाकी वाहनांमध्ये आलेली दिसत नाही. पण तशी व्यवस्था झाल्यास वाहनांच्या क्षेत्रामध्ये एक नवीन क्रांती होईल. याचा उपयोग देशाच्या प्रगतीसाठी निश्चितच होणार आहे, पण हे सर्व करीत असताना वाहनचालक आणि प्रवासी या सगळ्यांच्या जीविताची सुरक्षा याला प्राधान्य देणे हे देखील तेवढेच गरजेचे आहे.

# आठवणीतला गुढी पाडवा!

महाराष्ट्रातील विविध सण-उत्सव हे इथल्या कृषी-लोकसंस्कृतीच्या अनुषंगाने निर्माण झालेली सखोल परंपरा आहे. इथले सण, समारंभ, उत्सव हे निसर्गातील होणारे महत्वपूर्ण बदल आणि त्यांचा सृष्टी आणि मानवी जीवनावर होणारा महत्त्वपूर्ण परिणाम यातून उदयास आले आहेत. या सणांच्या माध्यमातून अनेक लोक म्हणी रूढ झाल्या आहेत. पाडवा, नीट बोल गाढवा अशी म्हण आम्ही लहानपणापासून ऐकत आलो आहोत. होळी-दिवाळी सणाच्या सुद्धा अनेक म्हणी समाजात प्रचलित आहेत. पाडव्याची ही म्हण मात्र फारच महत्त्वपूर्ण आहे. मराठी नववर्षाच्या पहिल्या म्हणजे पाडव्याच्या दिवशी प्रत्येकाने व्यवस्थित बोलण्याची शपथ घेणे असं अधोरेखित करणारी ही म्हण मला जास्त महत्त्वाची वाटते. आजही गावाकडचा गुढी पाडवा आठवला की; अनेक हळव्या, मजेशीर गोष्टींची विचार शृंखला मनपटलावर तरंगून जाते!



ग्रामीण भागात शेतकऱ्याच्या घरी एखादा सण येणार म्हटले की एक-दोन दिवसापासून त्याची तयारी होत असते आणि असे आमच्या लहानपणी आमच्या घरी होत असे. पाडव्याच्या दोन दिवस अगोदर माय-भाबी सर्व घर पोतरून घेत. नव्या सालाचे स्वागत करण्यासाठी ज्वारी-गहू साठवायच्या कणग्या झाडून, सारवून स्वच्छ केल्या जात. पाडव्याच्या आधल्या दिवशी शेतातून येताना बाबा किंवा दादा खरसडा नावाच्या एका वनस्पतीची (झुडूप) मोठी पेंढी घेऊन येत. कुठेकुठे ही वनस्पती पिसुळा म्हणून सुद्धा ओळखली जाते. पाडव्याच्या दिवशी सकाळी आंघोळ करताना प्रत्येकाने खरसडा डोक्यावर, कानात अडकवून, खांद्यावर, पायाखाली घेऊन आंघोळ करणं बंधनकारक होतं. खरसड्याची पेंढी नहानीच्या भिंतीवरच ठेवलेली असायची. नहानी घराच्या मुख्य दरवाजाच्या पाठीमागे कमरेच्या उंचीची बांधलेली साधी एल आकाराची मातीची भिंत, तिला दरवाजा नाही ना वर पत्र. त्या नहानीत घरातील स्त्रियांच्या अंघोळी उजडायच्या आत होत, नंतर पुरुषांच्या आंघोळी. हा खरसडा डोक्यावर खांद्यावर किंवा पायाखाली का घेतला जात असावा? याचा शोध घेतला असता ही एक महत्त्व-पूर्ण आयुर्वेदिक वनस्पती असून तिचे विविध आयुर्वेदिक उपयोग दिसून येतात. त्या वनस्पतीला क्षिरणी म्हणतात. अंगावर, पायाखाली घेऊन आंघोळ केल्याने शरीरातील वात आणि पित्त दोष नाहीसे होतात. त्याचबरोबर या काळात पिकाची काढणी झाल्यामुळे शेतात आणि घरात पिसुळे होतात. घरात-शेतातील पिसुळे नष्ट करण्याचे काम ही वनस्पती करते. त्याच बरोबर वसंत ऋतूत सगळीकडे वृक्षांना पालवी-मोहर फुटल्यामुळे अंगावर बारीक लाल गुदी (शीत पित्त) येतात त्या कमी करण्याचे कामसुद्धा ही वनस्पती करते.

सर्वांच्या अंघोळी झाल्यानंतर गुढी उभारण्याचा कार्यक्रम सुरू व्हायचा. ते काम माय, बाबा, दादा, भाबी करायचे आणि आम्ही दर्शक. माय तिचं नऊवारी लुगडं, पीस गुढीला नेसवून त्याला खरसडा, पाच-सात आंब्याचा घोस, लिंबाच्या फुलोऱ्याचा डहाळा, साखरेची गाठी गच्च आवळून बांधायची. त्यावर तांब्या-पितळेचा मोठा तांब्या पाच हळदी-कुंकवाची बोटं लावून उपडा ठेवायचा आणि मग सपराच्या बाजूला, वळचणीला लागून, तुळशीच्या वट्यावर बाबा-दादा टोपी घालून गुढी उभी करायचे. उभ्या गुढीची माय-भाबी पूजा करायचे. सर्वांना कुंकू लावले जायचे. तेव्हा घरात दहा-बारा माणसं होती. त्यानंतर दादांना आणलेला लिंबाचा फुलोरा आणि गावरान गूळ एका मोठ्या वाटीत मिसळून सगळ्यांना प्रसाद म्हणून वाटला जायचा. लिंबाचा फुलोरा आणि गुळ हे उष्णता रोधक आहेत हे तेंव्हा कुणाला माहिती होते! नंतर माय गुळ-कानवल्याचा नैवेद्य करून गुढीला वाहायची. गुढीपाडव्याच्या दिवशी सकाळचे जेवण म्हणजे लामट्याचा (शेवया) भात, त्यात गायीचं दूध, तूप आणि गुळ असायचा. असा होता पाडव्याचा सकाळचा पौष्टिक ब्रेकफास्ट!

पाडव्याच्या दिवशी दादा बैलांना नदीवरून धुवून आणायचा. शिंगाला वार्नीस लावायचा आणि सकाळी सकाळी वावरत औताचं एक तास काढायचा आणि मग बैलांना दिवसभर कामाला सुट्टी! असे वावरात चालले असतांना गावात पाडव्याच्या दिवशी विविध घडामोडी घडायच्या. सालगड्याचं साल ठरलं जायचं. एखाद्याच्या घरी जास्त काम असेल तर गडी त्या मालकाकडचं काम सोडून दुसऱ्या मालकाकडं जायचा. एखादा गडी कष्टाळू, इमानदार असेल तर त्याला वाढवून साल दिलं जायचं; पण ही एक प्रकारची वेठबिगारी, गुलामगिरीच होती, पण काय करणार बिचारे, जगायचं असेल तर काम करण भागंच होतं! सालगडी-वेठबिगारी आज जवळ-पास संपुष्टात आली आहे. सगळ्या गावात गुढ्या उभारलेल्या असायच्या. आम्ही पोरं गावभर फिरायचो. कोणाची गुढी किती उंच, कोणाच्या गुढीला कोणतं लुगडं नेसवलं याची चर्चा करायचो. अरे हो, एक राहिलंच की! गुढी उभारल्याबरोबर घरातल्या सगळ्या लेकरांना एक एक गाठी दिली जायची. ती गाठी मस्त गळ्यात घालून आम्ही सगळीकडे मिरवायचं. गाठीचा एक एक बत्तासा चोखायचा, त्याच्यामुळे मान, हात, तोंड चिकट व्हायचं. भोवताल माश्या घोंगावायच्या. मग माय नाही तर बाबा रागवायचे आणि मग आमची गाठी संपायची. हात तोंड धुवावं लागायचं. पाडव्याच्या दिवशीचा सर्वात महत्त्वाचा विषय म्हणजे संध्याकाळी सर्वांनी मिळून पुरणपोळीचे जेवण करायचं! त्यानंतर रात्री पारावर भजन असायचं. आम्ही बाबांसोबत भजनाला जायचो. आमचे बाबा खूपच छान, दणदणीत मृदंग वाजवायचे आणि मी बाबांच्या मांडीवर भजनातच झोपी जायचो! हा भजन-कीर्तनाचा संस्कार आमच्या रोमारोमात तेंव्हापासून आजतागायत संचरला आहे!

आजही आम्ही गुढी उभारतो. गुढी उभारायला मोजून दोन-तीन माणसं! आज सर्व सुविधा पायावर लोळण घेतात परंतु ती मजा, तो आनंद आज नाही. आजच्या आलेशान आरसीसी घरात तो फील येत नाही. ते पत्राचं, मातीचं घर असलं तरी माणसांनी गजबजलेलं होतं . दुधातूपाचा दरवळ घरभर यायचा. आज गावाकडचं घरही आरसीसीचं झालंय. गाई नाहीत, बैल नाहीत आणि गोठाही नाही. असं असतांना जुन्या आठवणींना उजाळा देत आणि माझ्या बाबांच्या, तेंव्हाच्या घराच्या आठवणी काढत आम्ही हा पाडवा साजरा करत आहोत! खरंच, गेलेले दिवस पुन्हा येत नाहीत! ते क्षण, ती माणसं, ती जागा आणि तो निखळ आनंद गेला तो गेलाच! असं असलं तरी आज पण आपण माणसं आणि नातेसंबंध जपूया! भावकी आणि घरातील माणसं केवळ मरण विटाळापूर्ती राहणार नाहीत याची काळजी घेऊया! तेंव्हा चला मित्रहो, सर्वांना मराठी नववर्षाच्या आणि गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!

**-प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये**
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि.परभणी
मो.९१५८० ६४०६८

# 'माणुसकीची गुढी'



हिंदू पंचांगानुसार साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त म्हणजे गुढीपाडवा होय.या दिवशी कोणताही मुहूर्त पाहण्याची आवश्यकता नाही. कारण हा दिवस अतिशय शुभ मानला आहे.या दिवशी शुभ कामे करावयाची असतात.नवनवीन वस्तू खरेदी करणे.

उदा सोने, शेती, वाहन, वास्तू.

प्रत्येक माणसांनी मानवी नैतिक मूल्यानुसार आपले वर्तन करावे. माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागून माणुसकीची गुढी उभी करावी. रुढी, प्रथा, परंपरेनुसार आपण वेग-वेगळे सण साजरे करतो. त्या सणाचे पावित्र्य नेहमी ठेवावे. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या तत्त्वाची गुढी उंच उभी करावी. त्यानुसार सर्वांना समानता द्यावी. कोणावरही कधीही, कोणत्याही अन्याय, अत्याचार, बळजबरी, अपहरण करू नये. गुढीपाडव्याच्या निमित्ताने आपली गुढी चैतन्याची, सुखाची, समृद्धीची व भरभराटीची असावी. तेव्हाच आपण आयुष्यभर केलेल्या परिश्रमाचे फळ आपल्याला मिळते. त्यानुसार आपले जीवन सार्थकी लागते. आज प्रत्येक माणूस स्वतंत्र आहे. त्याला जीवन जगण्याचा हक्क आहे. त्यासाठी आपला हक्क कोणी हिरावून घेत नाही. म्हणूनच प्रत्येक माणसांनी आपल्या घरासमोर उंच ठिकाणी माणुसकीची गुढी उभी करून सर्वांना शांततेने जीवन जगू द्यावे. आपणही जगा आणि दुसऱ्यालाही जगू द्यावे. श्रीराम प्रभूनी १४ वर्षे वनवास संपून अयोध्येत आले; आणि सर्वत्र आनंदी आनंद झाला. ढोल, ताशे, नगारे वाजवण्यात आले. रांगोळ्या काढून घराला तोरण बांधून आनंद व्यक्त करण्यात आला.पुरणपोळी करून सण साजरा करण्यात आला. तसाच आनंद आपण सुद्धा गल्लोगल्ली ,गावोगावी निर्माण करावा.आनंदी आनंद गडे,हर्ष उल्हास चोहिकडे असे म्हटले जावे. आज माणसांच्या मनात अढी निर्माण झाली. कोणीच कोणाला मानत नाहीत. प्रत्येक माणूस हा हातात वेगवेगळे झेंडे घेऊन फिरत आहे. त्यामुळे समाजात असुरक्षितेची भावना निर्माण झाली. हेवे-दावे निर्माण झाले आहेत.मी काही कोणापेक्षा कमी नाही. अशी माणसाच्या मनात अहंकाराची भावना निर्माण झाली. त्यामधून वैमनस्य आले.त्यामुळे समाज आज आक्रमक बनला आहे.

हे जर आपल्याला दूर करायचे असेल तर आपण आपले मन स्वच्छ व निर्मळ ठेवून *जे का रंजले गांजले। त्याशी म्हणे जो आपुले ।तोचि साधू ओळखावा। देव तेथेची जाणावा।।*.. याप्रमाणे जर आपण वागलो तर आ-पली गुढी चैतन्याची होईल. या गुढीला साखरेचा हार आहे. प्रत्येक माणसाच्या जीवनात आनंद असावा. त्यातून गोडवा निर्माण केला जावा. गुढीच्या निमित्ताने वाईट विचारांना मुठ माती द्यावी व वाईट विचार पालथे घातले जावेत. म्हणूनच गुढीला तांब्या पालथा घालून वाईट विचारांना थारा देऊ नये. प्रत्येक व्यक्तीने समाजात आपल्या विचार-आचारांची चांगली उंची वाढवावी. निर्मळ विचार उंच ठेवावेत. हिमालयाची उंची आपल्या देशाला लाभलेली आहे. त्याचा विसर पडू देऊ नये. प्रत्येकाने चांगल्या विचाराची स्पर्धा करावी. कधीही मनामध्ये इतराबद्दल कटूता आणू नये. सर्वधर्मसमभावाची शिकवण राज्यघटनेने दिलेली आहे. त्याचे पालन करावे. तेव्हा समाज प्रगल्भ होतो. सर्वजण आपण गुण्यागोविंदाने नांदू शकतो. आपले सण साजरे करताना इतरांच्या सणांना सुद्धा महत्त्व द्यावे. समाज विधायक कार्य करावेत. समाज विघातक कार्य करू नयेत.प्रत्येक ठिकाणी सर्वांना जाण्याचा समान अधिकार आहे. फिरण्याचा, बोलण्याचा, वास्तव्य करण्याचा, शिक्षण घेण्याचा तरी काही व्यक्ती चुकीचे विधाने करून समाजात अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. सणाचे पावित्र्य ठेवून सण साजरे केल्यास एकमेकाबद्दल जिव्हाळ्याचे, आपुलकीचे, सलोख्याचे संबंध निर्माण होतील. गुढीला लिंबाचे डहाळा (फांदी) लावला जातो. कारण तो कडू असतो. त्याचे कारण काय असेल प्रत्येकाने आपापल्या पद्धतीने वेगवेगळ्या अर्थ लावतात परंतु आयुर्वेदामध्ये लिंब या वृक्षाला अतिशय महत्त्वाचं स्थान दिलं आहे. लिंबापासून वेगवेगळे आयुर्वेदिक औषधे तयार केले जातात. लिंबाच्या रसाचा काढा करून पिल्यास अनेक रोग कमी होतात. श्रद्धेची गुढी असावी अंधश्रद्धेची नको. आज बराच समाज अंधश्रद्धेच्या विळख्यात सापडला आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन मनात बाळगून आपले जीवन सुखी जगावे. स्वयंघोषित बुवा,बाबा,महंत यांच्या नादी लागून अनेकांचे संसार धुळीस मिळाले आहेत. समाजातील प्रत्येक व्यक्तीने मुलं, बाळं, पत्नी यांना धोका होऊ नये.याची प्रत्यक्ष काळजी घ्यावी.

हे कलियुग आहे.आज समाजामध्ये आपण पाहत आहोत. अनेक कीर्तनकार खालच्या दर्जाची भाषा बोलत आहेत. अनेकांच्या हातून महापातक घडत आ-हेत. म्हणून दुष्ट दुर्जनापासून दूर राहावे. माणुसकीची गुढी उभी करावी.

प्रत्येक सणामधून बोध घ्यायचा असतो. सणांना विशेष महत्त्व आहे. त्यापासून आपण प्रेरणा घेऊन पुरोगामी विचाराकडे जायाचे असते.शालिवाहन शक गुढीपाडव्या पासून सुरुवात होतो. इंग्रजी कॅलेंडर व मराठी कालगणना या मध्ये ७८ वर्षाचा फरक असतो. शालिवाहन शक परवापासून १९४८ सुरू होतो.

(गुढीपाडवा १९ मार्च) त्यामुळे ग्रामीण भागात अतिशय आनंदाने साजरा केला जातो. सर्वांनी माणुसकीची गुढी उभी करावी. भुकेलेल्यांनाअन्न द्यावे. अनाथांना आश्रय द्यावा. सर्वांनीच सणाचा परमोच्चं आनंद घ्यावा. हे जीवन पुन्हा नाही याचीही जाणीव असावी. म्हणूनच समानतेची गुढी उभी करावी.

नवीन वर्षाच्या सर्व बांधवांना विठू माऊली प्रतिष्ठान खैरकावाडी ता.मुखेड कडून खूप खूप शुभेच्छा.

**-प्रा. विठ्ठल बरसमवाड**
संस्थापक :
विठू माऊली प्रतिष्ठान
खैरकावाडी ता.मुखेड जि.नांदेड

# झोपेच्या कमी कालावधीमुळं आरोग्य व मानवी वर्तनावर परिणाम

बालपणापासून ते पौगंडावस्थे (किशोरावस्था) पर्यंत मानवी शरीराला आठ ते दहा तासांची झोप गरजेची असते. पण गंमत अशी आहे की मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या झपाट्याने वाढत चाललेल्या विस्तारामुळं या वयोगटाच्या मुलांच्या झोपेवर सर्वाधिक हल्ला चढवला गेला आहे. जीवनशैलीतील बदल आणि औषधाशी संबंधित सर्व मानके आणि संकेतक या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधत आहेत की देशात आणि जगात सोशल मीडियाचा वापर वाढत असताना, आपल्या झोपेचा कालावधी आणि त्याची गुणवत्ता कमी होत आहे. समस्या केवळ झोपेची कमतरता नसून, झोपेच्या वेळी डिजिटल स्क्रीनच्या प्रकाशाचा आपल्या डोळ्यांद्वारे आणि मेंदूच्या सर्व तंतूंवर विपरीत परिणाम होतो. ही 'लाइट सर्कॅडियन रिदम', जी २४ तासांच्या कालावधीत शरीर आणि मेंदूला आराम देते आणि ताजेतवाने करते. आता याच झोपेच्या नैसर्गिक किंवा आंतरिक प्रक्रियेत व्यत्यय येत आहे. डे-ळळरश्र ाशवळर हरी ारवश ळीं वळषषळलीश्रीं ीं ीश्रशशि

.जगभरात असे अनेक अभ्यास आणि सर्वेक्षण झाले आहेत ज्यावरून असे दिसून आले आहे की रात्री अंथरुणावर आडवे झाल्यावर मोबाईल फोनचा वापर जागतिक स्तरावर वाढला आहे. त्यामुळे शरीर पुरेशी झोप मिळाल्यावर आपोआप मिळणारी ऊर्जा आणि जोम यापा-सून वंचित राहते. विकसित देशांमध्ये केलेल्या अभ्यासात असे आढळून आले आहे की सुमारे पंच्याण्णव टक्के किशोरवयीन मुलांकडे स्मार्टफोन आहेत, त्यापैकी पंचेचाळीस टक्के तरुणांनी कबूल केले की ते जवळजवळ सर्व वेळ मोबाइलवर 'ऑनलाइन' असतात. पौगंडावस्थेतील आणि तरुणांमधील ही प्रवृत्ती जागतिक आहे, म्हणून या वयोगटाला मानसिक आणि शारीरिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून सर्वाधिक धोका आहे.



२०१२ मध्ये, अमेरिकेतील वॉर्विक विद्यापीठाच्या वैद्यकीय संस्थेतील संशोधकांनी झोपेवर विस्तृत संशोधन केले. भारतासारख्या विकसनशील देशातील पंधरा कोटी लोक झो-पेशी संबंधित समस्यांनी त्रस्त असल्याचे समोर आले आहे. खरं तर, पूर्वी असे मानले जात होते की विकसित देशांतील बहुतेक लोक झोपेचा अभाव आणि मानसिक चिंतांनी ग्रस्त आहेत. परंतु अनेक आशियाई आणि आफ्रिकन देशांमध्ये केलेल्या या नवीन अभ्यासातून असे दिसून आले आहे की या देशांतील १६.६ टक्के लोकसंख्या झोपेच्या कमतरतेमुळे उद्भवणाऱ्या समस्यांना बळी पडते. हा आकडा विकसित देशांतील २० टक्के लोकसंख्येच्या अगदी जवळ आहे ज्यांना झो-पेशी संबंधित समस्या आहेत, त्यामुळे झोपेच्या समस्येच्या बाबतीत भारतासारखे देश लवकरच युरोप आणि अमेरिकेच्या देशांना मागे टाकू शकतात यात शंका नाही.

एक मात्र निश्चित आहे की आपली दैनंदिन दिनचर्या झोपेची गुणवत्ता आणि प्रमाण या आधारावर ठरवली जाते. देशांच्या एकूण उत्पादकतेवरही याचा परिणाम होत आहे. त्यामुळे रस्ते अपघातात वाढ होत आहे. गेल्या दोन-तीन दशकांत कॉल सेंटर्स आणि बीपीओ सेवांमुळे भारतात लाखो नोकऱ्या निर्माण झाल्या असल्या तरी, या व्यवसायांनी लाखो तरुणांची नैसर्गिक झोप मात्र हिरावून घेतली आहे, हे अनेकदा अध-ोरेखित होते. झोपेत व्यत्यय, त्याची कमतरता किंवा झोपेचे चक्र बिघडल्याने तणाव, रक्तदाब, हृदयविकार यांसारखे आजार होत आहेत. याचा परिणाम आपल्या सामाजिक वर्तनावरही होत आहे.

संशोधक आणि डॉक्टरांचा असा विश्वास आहे की मानवी शरीर २४ तासांमध्ये एकापेक्षा जास्त वेळा झोपण्यासाठी तयार केलेले आहे. म्हणजेच, रात्री व्यतिरिक्त, एखादी व्यक्ती दिवसा, विशेषतः दुपारच्या जेवणानंतर, हलकी डुलकी घेऊन स्वतःला ताजे आणि निरोगी ठेवू शकते. पण वाढत्या गजबजाट आणि आधुनिक शहरी जीवन (ज्यामध्ये रात्री उशिरापर्यंत ऑफिसमध्ये काम करणे आणि सोशल मीडियावर सक्रिय राहणे इत्यादींचा समावेश आहे ) यामुळं झोपेचं खोबरं झालं आहे.साहजिकच, लोकांना एक विशेष प्रकारचा निद्रानाशाचा आजार होतो, ज्यामध्ये लोक रात्री अनेक वेळा जागे होतात आणि नंतर मात्र पुन्हा लवकर झोप येत नाही.

अशाप्रकारे, संपूर्ण जगाला एक गोष्ट समजली आहे की झोपेचे कमी प्रमाण आणि गुणवत्तेमुळे मानवी दैनंदिन दिनचर्या मोठ्या प्रमाणात प्रभावित होते. कमी झोप घेतली आणि ती गाढ नसेल तर शारीरिक आणि मानसिक अशा दोन्ही समस्या उद्भवतात. ऑस्ट्रेलियाच्या व्हिक्टोरिया युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाच्या शास्त्रज्ञांनी २०१८ मध्ये झोपेच्या कमतरतेच्या आर्थिक परिणामांचे मूल्यांकन केले आणि अहवाल दिला की ऑस्ट्रेलियामध्ये झोपेच्या कमतरतेमुळे सुमारे १७.८८ अब्ज ऑस्ट्रेलियन डॉलरचे वार्षिक नुकसान होते. हे नुकसान ऑस्ट्रेलियाच्या जीडीपीच्या दीड टक्के आहे. हे नुकसान वाहन अपघात, झोपेच्या कमतरतेमुळे आरोग्याच्या समस्यांवरील खर्च, कार्यक्षमतेवर परिणाम इत्यादींमुळे होते. संशोधनाशी संबंधित 'स्लीप सर्व्हे' असे दर्शविते की जगातील प्रत्येक तिसरी व्यक्ती सध्या झोपेच्या विकाराने त्रस्त आहे. ऑस्ट्रेलियामध्ये ३३ ते ४४ टक्के, अमेरिकेत ३० टक्के आणि ब्रिटनमध्ये ३७ टक्के लोकांना झोपेच्या समस्या आहेत.

गेल्या सत्तर-ऐंशी वर्षांत झालेल्या आर्थिक आणि सामाजिक बदलांमुळे माणसाचा झोपेचा काळ सरासरी वीस टक्क्यांनी कमी झाला आहे. एका संशोधनानुसार, १९४० च्या दशकात बहुतेक लोक रात्री सरासरी आठ तास झोपायचे. मात्र आता ही सरासरी सात तासांवर आली आहे. अमेरिकेतील बर्कले येथील कॅलिफोर्निया विद्यापीठातील प्रोफेसर मॅट वॉकर यांचे हे मूल्यांकन आहे. काही वैज्ञानिक अभ्यासातून हेही सिद्ध झाले आहे की, दिवसभरात काम करताना थोडीशी डुलकी घेतली तर मेंदू आणि शरीराच्या पेशींना झोपेच्या कमतरतेमुळे होणारे नुकसान काही प्रमाणात भरून काढता येते. याबाबत, ब्रिटनमधील लीड्स विद्यापीठात दोन वर्षांपूर्वी केलेल्या अभ्यासातून असा निष्कर्ष काढण्यात आला की, कामाच्या वेळी दुपारी वीस मिनिटांची डुलकी घेतली तर त्याचा कर्मचाऱ्यांच्या सर्जनशीलतेवर आणि उत्पादकतेवर सकारात्मक परिणाम होतो. या झोपेमुळे मधुमेह, हृदयविकार आणि नैराश्याचा धोकाही कमी होतो.

शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की दुपारची झोप हे खरे तर माणसाच्या चांगल्या आरोग्याचे लक्षण आहे, परंतु शहरवासीयांना रात्री पुरेशी झोप मिळत नसल्याचेही यावरून सिद्ध होते. भारतीय वंशाचे संशोधक निरेन रामलखन यांनी दावा केला होता की, जगातील अनेक शहरांमध्ये लोकांना रात्री सरासरी पाच तासांची झोप मिळत आहे आणि काही ठिकाणी ती एक तासानेही कमी होत आहे. हा एक धोकादायक ट्रेंड आहे आणि दुपारच्या झोपेने त्याची भरपाई केली जाऊ शकते. त्यामुळे कर्मचाऱ्यांना दुपारची झोप घेण्यास प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. असे करण्यात अयशस्वी झाल्यास कर्मचाऱ्यांना आठवड्याच्या शेवटी झोपायला भाग पाडल्यास गंभीर परिणाम होऊ शकतात.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत, जि. सांगली

# नांदेड ग्रंथोत्सव-२०२५ : वाचकांनी केली विक्रमी खरेदी; लाखो रुपयांची ग्रंथविक्री





**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड ग्रंथोत्सव २०२५ हा १४ व १५ मार्च रोजी उत्साहात संपन्न झाला. वाचकांना नियोजित कार्यक्रमाच्या साहित्यिक मेजवानी सोबतच आयोजकांनी मोठ्या प्रमाणात पुस्तकांचे स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले होते. या ग्रंथोत्सवात वाचकांनी ग्रंथांची विक्रमी खरेदी केली.

वाचकांना व ग्रंथालय चालकांना पाहिजे असलेली पुस्तके मिळावीत या हेतूने छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय प्रकाशनाचे स्टॉल, शांती पब्लिकेशन पुणे तसेच जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथील ग्रंथ प्रदर्शन स्टॉल, संकेत प्रकाशन, निर्मल प्रकाशन नांदेड, संदेश बुक डेपो परभणी, प्रगती बुक डेपो हिंगोली, मांडणीकर बुक डेपो नांदेड, मराठवाडा बुक सेलर नांदेड, ओमकार प्रकाशन नांदेड व इतर पुस्तकांचे स्टॉल मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करून देण्यात आले होते.

या ग्रंथप्रदर्शन व विक्री स्टॉलचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक सुरेश सावंत यांनी केले. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महापौर कविता मुळे, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, डॉ. मा. मा. जाधव, प्रा. संजय जगताप, साहित्यिक डॉ. विलास वैद्य, साहित्यिक नारायण शिंदे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी आदी मान्यवरांनी हजेरी लावली.

प्रकाशकांनी मोठ्या प्रमाणावर वाचकांना दर्जेदार ग्रंथ उपलब्ध करून दिले होते. त्याला वाचक, ग्रंथालय चालकांनी मोठ्या प्रमाणात ग्रंथखरेदी करून प्रतिसाद दिला आहे. दोन दिवसांत जवळपास दहा लाख रुपयांचे ग्रंथ विक्री झाल्याचे समजते.

# सायन्स कॉलेजमध्ये 'ग्लोबल रिसायकलिंग' दिवस साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)** –सायन्स कॉलेजमध्ये 'ग्लोबल रिसायकलिंग' दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

जागतिक पुनर्वापर दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून पीपल्स कॉलेजचे माजी उपप्राचार्य डॉ. बालाजी कोम्पलवार, प्रतिभा निकेतन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. डी. के. स्वामी, यशवंत कॉलेजचे डॉ. व्ही. सी. बोरकर यांची उपस्थिती होती.




याप्रसंगी ग्रंथालयाच्या समोर 'ग्लोबल रिसायकलिंग'चा अभ्यास करण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत व दुर्मिळ पुस्तकाचे प्रदर्शन डॉ. प्रशांत सुतकर यांनी आयोजित केले होते. पुस्तक प्रदर्शनामध्ये सायन्समधील पुस्तके विद्यार्थ्यांनी व मान्यवरांनी हाताळली व उपयुक्त संदर्भ ग्रंथ विद्यार्थी व रसिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आले. प्रा. डॉ. डी. एम. जाधव यांनी जगामध्ये वेगवान घडामोडी घडत आहेत त्याचा मानवी जीवनावरील परिणाम व झोलो बायोटिक याविषयी माहिती सांगितली.

प्रतिभा निकेतन येथील उपप्राचार्य डॉ. डी. के. स्वामी यांनी ३ आर बद्दल सविस्तर माहिती सांगितली. यशवंत महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. व्ही. सी. बोरकर यांनी 'जीवो जीवस्य जीवनम' याचा अर्थ सांगितला. आपण सर्वांनी प्लास्टिकचा वापर मर्यादित करावा व पर्यावरणाचे रक्षण करावे असे आवाहन केले. पीपल्स कॉलेजचे माजी उपप्राचार्य डॉ. बालाजी कोम्पलवार यांनी आपल्या भागातील उत्पादनाचा वापर करावा, ज्याचा उपयोग आपल्या शेतकऱ्यांसाठी होणार आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आवश्यकच आहे, त्यासोबत चिरंतर विकास होणे आवश्यक आहे. आपल्या येथे उगवणाऱ्या कापसापासून तयार झालेल्या कापडाचा उपयोग शर्टसाठी, भाकरी बांधण्यासाठी, वापरलेल्या तेलाचे शुद्धीकरण करण्यासाठी, चेंडू बनवण्यासाठी, घर सारवण्यासाठी व शेवटी त्या कपड्याची चिंधी बनवण्यासाठी केला जातो हे पुनर्वापराचे उत्तम उदाहरण देऊन उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एल. पी. शिंदे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सायन्स कॉलेजमध्ये गोबर गॅस, गांडूळ खत निर्मिती, रेन वॉटर हार्वेस्टिंग, वॉटर परकुलेशन टँक अशा प्रकारचे चांगले उपक्रम राबवत आहे असे सांगितले. विद्यार्थ्यांनी प्लास्टिकचा वापर कमी करावा. कागदी किंवा कापडी पिशवी वापरावी, असे आवाहन डॉ. एल. पी. शिंदे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राजेश्वर रैनी व आभार प्रदर्शन डॉ. प्रशांत सुतकर यांनी केले. महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ. अरुणा शुक्ला व एकनाथ खिल्लारे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मदत केली. तर ग्रंथालयामधील कर्मचारी पांडुरंग कदम, श्रीमती सविता गंगवाल, महेश डोंगरकर, कु. वैष्णवी राजूरकर, श्रीमती श्रद्धा जोशी व किरण वंजारी यांनी मेहनत घेतली. यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत आरपीएफची तत्पर कारवाई; परभणी रेल्वे स्थानकावर चोरीचे दोन प्रयत्न हाणून पाडले



**नांदेड (प्रतिनिधी)** –प्रवाशांच्या सुरक्षिततेबाबत आपली बांधीलकी कायम ठेवत नांदेड विभागातील रेल्वे संरक्षण दलाने ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत परभणी रेल्वे स्थानक येथे चोरीचे दोन प्रयत्न हाणून पाडले.

१७ मार्च रोजी ११:३० वाजता सीबीआय/नांदेडचे एसआय अमोल वावळे आणि कॉन्स्टेबल अजित हे परभणी रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक १ व फूट ओव्हर ब्रिज परिसरात प्रवाशांच्या मालमत्तेची चोरी करणाऱ्या संशयितांवर नजर ठेवत होते. यावेळी त्यांनी विनोद (रा. परभणी) यास संशयित म्हणून ताब्यात घेतले, जो प्रवाशांचे सामान चोरी करण्याचा प्रयत्न करत होता.

त्याच दिवशी सुमारे ११:४५ वाजता, त्याच पथकाने एफओबी जवळील यार्ड परिसरात गस्त घालत असताना नारायण (रा. परभणी) यासही अशाच प्रकारे चोरीचा प्रयत्न करताना पकडले.

दोन्ही आरोपींना पुढील कायदेशीर कारवाईसाठी तात्काळ शासकीय रेल्वे पोलीस (जीआरपी), परभणी यांच्या ताब्यात देण्यात आले. जीआरपी परभणी यांनी दि. १७ मार्च रोजी महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम ११० व ११७ अंतर्गत गुन्हा क्रमांक ६३/२०२६ व ६४/२०२६ नोंदविले आहेत.

आरपीएफ कर्मचाऱ्यांच्या या तत्पर कारवाईमुळे ऑपरेशन यात्री सुरक्षा अंतर्गत प्रवाशांवरील गुन्हे आटोक्यात आणण्याच्या प्रयत्नांना बळ मिळाले असून रेल्वे परिसर अधिक सुरक्षित करण्याच्या उद्दिष्टाला गती मिळाली आहे.

रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना सतर्क राहण्याचे व कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास तत्काळ आरपीएफ कर्मचाऱ्यांना किंवा रेल्वे सुरक्षा हेल्पलाईनवर कळविण्याचे आवाहन केले आहे.

# रसायनशास्त्र विषयात नवशबा तजीन यांना पीएच. डी. प्रदान

**नांदेड (प्रतिनिधी)** –स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडतर्फे नवशबा तजीन बशीर अहमद यांना रसायनशास्त्र विषयात पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली.



सदर विद्यापीठातील स्कूल ऑफ केमिकल सायन्सेसच्या संचालिका डॉ. सौ. संगीता माकोने ह्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी 'नॉवेल सिन्थेसिस ऑफ बॉयलॉजिकली ॲक्टीव निट्रोजन कॉन्टेनिंग हेट्रोसायकल्स यूजिंग लॉनिक लिक्वीड्स' या विषयावर प्रबंध सादर केला. या यशा बद्दल त्यांचे अनेकांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सावरगाव नसरत येथील जि. प. प्राथमिक शाळेच्या विद्यार्थिनींनी मिळविले नवोदय प्रवेशासाठी यश



**लोहा (प्रतिनिधी)**– लोहा तालुक्यातील सावरगाव नसरत येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी नवोदय विद्यालय प्रवेश निवड यादीत चमकदार यश संपादन करत गावाच्या शैक्षणिक परंपरेला उजाळा दिला आहे. कु. अपेक्षा गजानन बेल्हाळे व कु. स्वरा शरद बेद्रे या दोन्ही विद्यार्थिनी नवोदय प्रवेशासाठी पात्र ठरल्या आहेत.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सावरगाव नसरत ही शाळा गुणवत्तेच्या जोरावर सातत्याने प्रगती करत आहे. स्कॉलरशिप, होमी भाभा, एनएमएमएस तसेच नवोदयसारख्या स्पर्धा परीक्षांमध्ये तालुका व जिल्हास्तरावर अव्वल स्थान पटकावत आहे. या यशामुळे शाळेचा गुणवत्तेचा चढता आलेख अधिक उंचावत आहे.

या उल्लेखनीय यशामागे मुख्याध्यापक भुजंग खेडकर यांचे मार्गदर्शन तसेच शिक्षक बालाजी बालाघाटे, संभाजी बाबर, रमेश बाबर, आर. जी. वाघमारे, व्ही. एस. टोकलवाड, पंडित कोपनर, सौ. माने, सौ. आंबेकर, सौ. इंद्राळे, ज्ञानेश्वर कदम, मारोती कदम, बालाजी ढवळे यांचे परिश्रम मोलाचे ठरले.

# संस्कार भारती नांदेड समितीतर्फे आज सूर पाडवा कार्यक्रमाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –मराठी नववर्षाची सुरुवात सुरेल अभिजात संगीताने व्हावी यासाठी संस्कार भारती नांदेड परिवारातर्फे सूर पाडवा हा कौशिकी चेतन पांडे व ऋग्वेद सचिन आपस्तंभ या सृजनशील युवा कलावंतांचा शास्त्रीय व उपशास्त्रीय आविष्कार असलेला सुश्राव्य गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन गुरुवार दि. १९ मार्च रोजी आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. प्रमोद देशपांडे यांच्या शारदा संगीत विद्यालय, प्रेमनगर, नांदेड येथे सायंकाळी ६ वाजता गुढीपाडवा दिवशी नववर्षाच्या पार्श्वभूमीवर कार्यक्रम होणार असून, कार्यक्रमाचे अध्यक्ष पं. रत्नाकर आपस्तंभ (ज्येष्ठ गायक) तसेच प्रमुख अतिथी म्हणून पं. धनंजय जोशी (सुप्रसिद्ध गायक), डॉ. जगदीश देशमुख (प्रांत महामंत्री), डॉ. वैशाली गोस्वामी कुलकर्णी (प्रांत मंत्री, संस्कार भारती देवगिरी प्रांत) यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमात राघव जोशी(तबला), मिहीर जोशी (संवादिनी), भगवानराव देशमुख (साइड ऱ्हीदम) यांची साथसंगत असणार आहे.

# राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्तीसाठी आंदोलन



**किनवट (प्रतिनिधी)**– किनवट-नांदेड राष्ट्रीय महामार्ग १६१ ए वरील जीवघेणे खड्डे, उडणारी धूळ आणि त्यामुळे दररोज होणाऱ्या अपघातांमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी आता थेट संघर्षाची भूमिका घेतली आहे. प्रशासनाच्या नाकर्तेपणाला कंटाळून गोकुंदा परिसरातील शेकडो नागरिकांनी दि. २० मार्च रोजी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सहायक जिल्हाधिकारी जेनिथ चंद्र दोन्तुला यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

गोकुंद्याच्या सेंटमरी स्कूल ते किनवटच्या एन. के.गार्डनपर्यंतच्या राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ ए या महामार्गाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. रस्त्यावर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहन चालवणे कठीण झाले असून, हा मार्ग आता राष्ट्रीय महामार्ग की, पांदण रस्ता? असा प्रश्न नागरिकांतून उपस्थित होत आहे. या रस्त्यावरून प्रवास करताना प्रवाशांना मणक्याचे आणि कंबरदुखीचे गंभीर आजार जडले आहेत. विशेषतः रुग्णवाहिकांना या रस्त्यावरून जाताना मोठी कसरत करावी लागते. ज्यामुळे रुग्णांचा जीव धोक्यात येत आहे.

नागरिकांनी वेळोवेळी संबंधित विभागाला निवेदने दिली. प्रशासकीय कामकाजासाठी अलीकडेच किनवट भेटीवर आलेले जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचेही या रस्त्याच्या दुरवस्थेकडे लक्ष वेधले. तरीदेखील रस्ता दुरुस्त झाला नाही. प्रशासनाच्या या उदासीनतेमुळेच सामाजिक कार्यकर्ते बबन वानखेडे यांच्यासह शेकडो नागरिक, व्यापाऱ्यांनी एकत्रित येत दि. २० मार्च रोजी रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला आहे.

# अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या जिल्हाध्यक्षपदी नारायण अंबुरे यांची नियुक्ती



**नांदेड (प्रतिनिधी)** –अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या नांदेड जिल्हा अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते नारायण अंबुरे व नांदेड दक्षिण तालुकाध्यक्षपदी देवराव पांचाळ आदींची निवड करण्यात आली. समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी नुकतेच नियुक्तीपत्र दिले आहे.

सामाजिक कार्यात सदैव सक्रिय राहणारे नारायण अंबुरे यांच्या कार्याची दखल घेऊन मुंबई येथे संस्थापक अध्यक्ष तथा मंत्री छगनराव भुजबळ यांनी नारायण अंबुरे यांची नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती केली तर नांदेड दक्षिण तालुकाध्यक्षपदी देवराव पांचाळ, कंधार तालुकाध्यक्षपदी श्रीराम डुबूकवाड, मुदखेड तालुका अध्यक्ष शिवकुमार देवकते, लोहा तालुकाध्यक्ष प्रकाश शिंदे, धर्माबाद सचिन देशमुख, बिलोली बाबाराव लोटलवार, नायगाव सटवा मोदलवार, देगलूर पंकज चौडेकर आदींची नियुक्ती करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल रमेश तालीमकर, किशन धुमाळ, व्यंकटराव इंगळे, शिवाजी मगर, साहेबराव डाकोरे यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीर संपन्न

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र, सिडको, नांदेड येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीर नुकतेच पार पडले.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष डॉ. नानासाहेब जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एन. जी. पाटील होते तर मार्गदर्शक म्हणून अनंत राऊत, संचालक राऊत स्पर्धा परीक्षा अकॅडेमी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मेघराज कपूर यांनी केले.




होतकरून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी योग्य मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजकांनी सांगितले. या शिबिरामध्ये मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी, अभ्यासाचे नियोजन कसे करावे, वेळेचे व्यवस्थापन, तसेच अभ्यासासाठी आवश्यक असलेली पुस्तके आणि संदर्भ साहित्य याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

स्पर्धा परीक्षेमध्ये यश मिळवण्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य दिशा आणि आत्मविश्वास अत्यंत महत्त्वाचा असतो. विद्यार्थ्यांनी दररोज नियोजनबद्ध अभ्यास करून चालू घडामोडींचे ज्ञान वाढवावे, असे मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील उपस्थित प्राध्यापकवृंद प्रा. डॉ. व्ही. एस रेड्डी, प्रा. प्रा. डॉ. डी. के. कठोडे, प्रा. डॉ. ए. ए. शेख प्रा. डॉ. ए. एन कर्डीले प्रा. जी. एच. बडगिरे, सुनिल कंधारकर, गणेश तेलंग, अजय सुताडे आदींची उपस्थिती होती.

# 'ग्रामीण कॅम्पस'मध्ये रक्तदान शिबीर; १४० जणांनी केले रक्तदान

**नांदेड (प्रतिनिधी)**– ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव कै. शिवराम पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस, विष्णूपुरी येथे नुकतेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. समाजातील गरजू रुग्णांना उन्हाळ्यात भासणारा रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन हा उपक्रम राबवला जातो. यंदाच्या शिबिरात एकूण १४० रक्तदात्यांनी सहभाग नोंदवत रक्तदान केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पदविका अभियांत्रिकीच्या प्राचार्या शिल्पा मुळे यांच्या हस्ते कै. शिवराम पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर रक्तदान शिबिरास प्रारंभ झाला. या शिबिरात रक्तसंकलनासाठी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, इंडियन रेडक्रॉस सोसायटी, गोळवलकर गुरुजी रक्तपेढी,



हुजूर साहिब रक्तपेढी, गुरु गोविंदसिंघजी, जीवन आधार, जिजाई, नांदेड आणि नंदीग्राम या रक्तपेढ्यांनी सहभाग घेतला. कॅम्पसमधील विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक बांधीलकी जपली. विशेष म्हणजे रक्तदात्यांमध्ये मुलींचा सहभागही लक्षणीय होता.

या प्रसंगी डॉ. ओमप्रकाश दरक यांनी वैयक्तिक ४९ वे, तर ॲड. संतोष मैड यांनी १९ वे रक्तदान केले. तसेच डॉ. राजू कांबळे (१५ वे) आणि इंजि. सोनाली देशमुख (१३ वे) यांनीही रक्तदान करून प्रेरणादायी संदेश दिला. याशिवाय प्रा. वैशाली सावंत, प्रा. सोनाली येन्नावार, प्रा. धीरज काशिदे, प्रा. अक्षत झडते, प्रा. दीपक राठोड, प्रा. सुनील सरपे, सौरभ कोत्तावार, प्रा. संदीप वडगावे, अभय वाघमारे, प्रा. रितिक पिंपळे, प्रा. अनिकेत कांबळे, प्रा. अभिजीत पवळे, प्रा. साक्षी तिवारी, कुणाल चुकेवाड, बालाजी आठवले, अभय देशमुख, पवन उराडे, प्रथमेश वासमवार यांच्यासह अनेक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

हे रक्तदान शिबीर वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञान विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. दीपाली धोत्रे पाटील, डॉ. काजल गजभारे, प्रा. पौर्णिमा गवळी, प्रा. विभाती भालेराव, प्रा. कल्याणी कुलकर्णी आणि डॉ. विजय जमधाडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

या उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष संजय पवार, सचिव डॉ. विजय पवार, पदवी अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. प्रभुलिंगम उल्लागड्डी आणि उपप्राचार्य संजय देऊळगावकर यांनी सर्व रक्तदात्यांचे अभिनंदन करून रक्तदान हेच श्रेष्ठ दान हा संदेश समाजापर्यंत पोहोचवणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक केले.

# रामपूर येथे जलमहोत्सव उत्साहात साजरा

## पाण्याचे संवर्धन ही काळाची गरज -दत्तात्रय कुरूंदे

**नांदेड (प्रतिनिधी)**– भविष्यातील पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेता पाण्याचे जतन व संवर्धन अत्यंत आवश्यक असून, त्यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. भूगर्भातील पाणीपातळी वाढविण्यासाठी पाणी जमिनीत मुरविणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन सहाय्यक गट विकास अधिकारी दत्तात्रय कुरूंदे यांनी केले.



देगलूर तालुक्यातील रामपूर येथे आयोजित जलमहोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते. केंद्र व राज्य शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत 'हर घर नल से जल' ही योजना यशस्वीपणे राबविणाऱ्या गावांमध्ये ८ ते २२ मार्च दरम्यान जलमहोत्सव साजरा केला जात आहे. या निमित्ताने ग्रामस्थांना पाण्याचे महत्त्व पटवून देत विविध शासकीय योजना प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच स्नेहाताई पांडवे होत्या. त्यांनी सांगितले की, रामपूर ग्रामपंचायतीमार्फत गावातील सर्व कुटुंबांना जलजीवन मिशन अंतर्गत नियमित शुद्ध पाणीपुरवठा केला जात असून, ग्रामपंचायत गावाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

यावेळी उपअभियंता व्ही. जी. जाधव यांनी उपलब्ध पाणीस्रोत बळकट करून भविष्यात पाणीटंचाई भासू नये यासाठी प्रशासन ग्रामस्थांना पूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाही दिली.

कार्यक्रमाची सुरुवात जलपूजनाने करण्यात आली. त्यानंतर पाणी तपासणीचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. सहशिक्षक आशिष गडपसार यांनी उपस्थितांना जलसंवर्धनाची प्रतिज्ञा दिली. तसेच पाणी नमुना तपासणी करणाऱ्या महिलांचा व जलपुरवठा कर्मचारी अनिल इंगोले यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर जल अर्पण दिवस कार्यक्रमांतर्गत ग्रामपंचायत कार्यालयापासून पाणी टाकीपर्यंत व गावातील प्रमुख रस्त्यांवरून जल रॅली काढण्यात आली. या रॅलीत शालेय विद्यार्थी, महिला, ग्रामस्थ व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

# ऑफिसमध्ये साडीसोबत कॉलर ब्लाऊज!

**ऋतू कोणताही असो, महिलांच्या वॉर्डरोबमध्ये साड्या नेहमीच टॉपवर असतात. कारण कोणतेही फंक्शन असो, महिला साडी नेसणे पसंत करतात. पण उन्हाळ्यात साडी नेसताना खूप त्रास होतो. कारण डिझायनर साड्यांचे फॅब्रिक जाड असते आणि अनेक साड्यांचे ब्लाउजही इतके वेगळे असतात की, तेव्हा त्रास होऊ शकतो. अशावेळी कॉलर ब्लाऊज हा ट्रेंडी पर्याय असू शकतो.**

कॉलर ब्लाऊजचा ट्रेंड हा काही नवा नाही. महत्वाचं हा ट्रेंड खूप जुना आहे. याला आपण रेट्रो फॅशन देखील म्हणू शकतो. मात्र आता ही फॅशन खूप ट्रेंडमध्ये आहे. ब्लाऊजमध्ये सध्या नवनवीन कॉलर डिझाइन पाहायला मिळत आहे. यामध्ये ब्लाऊज स्टायलिश आणि एलिगेंट दिसतो. मात्र कॉलर असलेल्या ब्लाऊजसोबत साडी कशी ड्रेप करावी हे समजून घेणं देखील गरजेचं आहे.



## चेल्सी कॉलर ब्लाऊज

आजकाल चेल्सी कॉलर ब्लाउज खूप ट्रेंडमध्ये आहे. जर तुम्ही साडीसोबत चेल्सी कॉलर ब्लाउज घातला असाल तर तुम्ही या स्टाईलमध्ये साडीचा पदर कॅरी करू शकता. चेल्सी कॉलर ब्लाउज स्टाईलमध्ये तुम्ही साडीचा पदर रुंद करून खांद्यावर पिन करू शकता. या प्रकारच्या ब्लाउजमध्ये तुमची छाती झाकली जाईल पण मानेचा भाग चांगला दिसेल. या प्रकारच्या ब्लाउजला अधिक स्टायलिश लुक देण्यासाठी तुम्ही सोन्याची पातळ साखळी घालू शकता. अशा प्रकारचे ब्लाउज बनवण्यासाठी तुम्ही प्रिंटेड फॅब्रिक निवडू शकता, परंतु तुम्हाला फक्त सॉलिड कलरचीच साडी घालावी लागेल.

## क्रू कॉलर ब्लाऊज



क्रू कॉलर नेकलाइन काहीशी टर्टल नेकलाइनसारखीच आहे. पण क्रू कॉलर नेकलाइन मान कमी कव्हर करते. या प्रकारच्या ब्लाउजमध्ये साडी कशी नेसायची. क्रू कॉलर ब्लाउजमध्ये तुम्ही काउल स्टाइलमध्ये पदर कॅरी करू शकता. तुम्हाला हवं असेल तर गडबडीत पदर खांद्यावरही नेऊ शकता. जर तुम्हाला क्रु कॉलर ब्लाउजसोबत नेकलेस घ्यायचा असेल तर तुम्ही चोकर किंवा लेयर्ड नेकलेस देखील घालू शकता. या प्रकारच्या ब्लाउजमध्ये तुमच्या मागच्या बाजूला बटण किंवा झिप असायला हवी.

## शॉल कॉलर स्टाइल ब्लाऊज

या प्रकारचा ब्लाउज दिसायला अतिशय शोभिवंत दिसतो. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे शाल कॉलर शैलीचा ब्लाउज तुमची छाती आणि पाठ कव्हर करतो. जर तुम्ही या प्रकारच्या ब्लाउजसोबत साडी नेसत असाल तर या टिप्स लक्षात ठेवा...

- कॉटन फॅब्रिकच्या साडीने अशा प्रकारचे ब्लाउज बनवावेत.
- तुम्ही शाल कॉलर स्टाईल ब्लाउजसह निरो प्लेट्ससह पदर बनवा आणि खांद्यावर पिन करा.
- अशा कॉलर ब्लाउजसाठी ऑप प्रिंटेडऐवजी सॉलिड कलर फॅब्रिक निवडणे चांगले.

## हाफ चायनीज कॉलर ब्लाऊज

चायनीज कॉलर आणि हाफ चायनीज कॉलर दोन्ही स्टाईल ब्लाउजला स्टायलिश लुक देतात. जर तुम्ही अशा प्रकारचे ब्लाउज डिझाइन साडीसोबत घालत असाल तर तुम्ही या टिप्स लक्षात ठेवा...

- चायनीज कॉलर किंवा हाफ चायनीज कॉलर ब्लाउजसोबत तुम्ही ओपन फॉल स्टाइल पदर कॅरी करू शकता.
- या प्रकारच्या ब्लाउजमध्ये नेहमी मागच्या बाजूला बटण लावा. जर बटणे मागील बाजूस असतील तर तुम्ही पदर काऊल स्टाईलमध्ये कॅरी करू शकता.



# महागड्या साड्यांची काळजी!



**साडी म्हटलं की महिलांचा सॉफ्ट कॉर्नर असतो. ऑफिस असो किंवा लग्न समारंभ महिलांची पहिली पसंती साडीलाच असते. कोणत्याही कार्यक्रमात सिल्कची साडी एलिगंट लूक देते. साडीची फॅशन कधीच आऊटडेटेड होत नाही. अगदी साध्या साडीतही स्त्रीचे सौंदर्य खुलून दिसते अशी मान्यता आहे. महिला शॉपिंग करताना खूप वेळ लावतात अशी एक तक्रार नेहमी ऐकायला मिळते. जर महिला साडी खरेदी करताना एवढा विचार करत असतील तर त्या साड्यांची काळजी घेणंही तितकंच महत्त्वाचं आहे.**

महिलांकडे सिल्क, खादी, कॉटन, बनारसी अशा अनेक प्रकारच्या साड्या पाहायला मिळतात. पण या साड्यांची काळजी कशी घ्यायची हे मात्र फारच कमी जणींना माहीत असतं. साडी प्रेमापोटी अनेकजणी विविध प्रकारच्या सिल्कच्या साड्यांची खरेदी करतात पण या साड्यांची काळजी आपण एखाद्या लहान बाळा प्रमाणे घेतली पाहीजे असे म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. चला तर मग जाणून घेऊयात साड्यांची काळजी आपण कशी घेऊ शकतो.

- साड्यांना होणारा बुरशीचा प्रादूर्भाव थांबवण्यासाठी उपाय : सिल्कच्या साड्या दमट झाल्या तर त्यांचा रंग उतरण्याची शक्यता असते. या शिवाय या साड्यांना बुरशींचा प्रादूर्भाव होऊ शकतो. सिल्कची साडी थोड्याशी ओलसर राहिली तरी ती फाटू शकते. त्यामुळे साड्यांचे नुकसान होऊ शकते. यासाठी सिल्कची साडी कपाटात ठेवताना नेहमी सुती किंवा तलम कापडामध्ये ठेवा. रंग उतरत असल्याने या साड्या इतर साड्यांसोबत ठेवू नका. साडीचा बुरशी पासून बचाव करण्यासाठी अधून मधून साडील ऊन दाखवा.यामुळे साडीमध्ये ओलावा राहणार नाही आणि दमट वास येणार नाही.
- साडी कशी धुवावी? : सिल्क, खादी सारख्या साड्या घरी धुवूच नये पण जर तुम्ही साडी घरी धुणार असाल तर साडी थंड पाण्यामध्ये टाकून सौम्य साबणाने धुवावी. पण शक्यतो साड्या ड्रायक्लिन कराव्यात. यामुळे साड्यांचे आयुष्य वाढते आणि त्या दीर्घकाळ टिकतात.
- साडी कपाटात कशी ठेवावी? : साडी कपाटात ठेवतानासुद्धा काळजी घेणं महत्त्वाचं असते. साडी कपाटात हँगरवर लावून ठेवण्याऐवजी तिची नीट घडी घालून ठेवावी. एखाद्या पांढऱ्या रंगाच्या सुती कापडामध्ये गुंडाळून ठेवल्याने साड्या जास्त काळ टिकतात. पण साडीची घडी काही काळाने उघडावी जर तुम्ही असे केले नाही तर साडी विरते. शक्य असल्यास साडीमध्ये बटर पेपर ठेवा. त्याच प्रमाणे सिल्कची साडी इस्त्री करताना नेहमी उलट्या बाजूने करावी. म्हणजे तिची चमक कमी होणार नाही आणि त्यावरचं जरी काम कमी होणार नाही.
- बनारसी साडीची काळजी कशी घ्यावी : सध्या लग्नाचा काळ सुरू आहे. लग्नासारख्या कार्यामध्ये महिला बनरसी साडीला प्राधान्य देताना दिसतात. पण या साडीची आपण जास्त काळजी घेतली पाहिजे. नाहीतर काही काळाने या साड्या जुन्या वाटू लागतात. यासाठी बनरसी साड्या कपाटात ठेवताना वेगळ्या ठेवा इतर साड्यांमध्ये या साडीचा समावेश करू नका. या साडीला घरी धुण्याची चुक करु नका ही साडी ड्रायक्लिन करावी. इस्त्री करतानाही ही विशेष काळजी घ्या. ही साडी इस्त्री करताना साडी जळणार नाही याची काळजी घ्या.
- सोनचाफ्याच्या फुलांचा वापर : साडीला बुरशी लागणे ही फार सामान्य गोष्ट आहे. त्यासाठी तुम्ही कडूलिंबाची पान सुकवून ती एखाद्या कापडात गुंडाळून साडीमध्ये ठेवू शकता किंवा वॉर्डरोबमध्ये सुकलेली सोनचाफ्याची फुलं,चंदनाचं लाकूड ठेवू शकता. यामुळे साड्यांना चांगला सुगंधसुद्धा येईल आणि साडी जास्त काळ टिकेल. शिवाय परफ्युमचा वापर करताना थेट साडीवर करू नये, नाहीतर परफ्युममधील केमिकल्समुळे टिश्यूच्या धाग्यांवर व्यस्त परिणाम होऊ शकतो.



# चिकनकारीच्या मदतीने द्या उन्हाळ्याला 'रॉयल लूक'



**लखनऊ हे शहर तेथे मिळणाऱ्या खाद्यपदार्थांसाठी तर प्रसिद्ध आहेच पण ते अजून एका गोष्टीसाठी प्रसिद्ध आहे ते म्हणजे चिकनकारी कापड. मुघल राणी नूरजहाँ या राणीने ही पद्धत शोधून काढली अशी मान्यता आहे. चिकनकारी हे एक प्रकारचे भरतकाम असून पर्शियन भाषेत त्याला 'चिकन' असे म्हणतात. 'चिकनकारी' या प्रकारात सुई घाग्याने पातळ कापडावर भरतकाम करून सुंदर नक्षीकाम केले जाते. भारतात या शब्दाचा अपभ्रंश होऊन 'चिकनकारी'असे नाव तयार झाले अशी मान्यता आहे. मऊ मुलायम कापडावर केलेल्या या कलेला भारतातच नाही तर परदेशातही खूप मागणी आहे. या उन्हाळ्यात जर तुम्हाला स्टायलिश लूक सोबतच रॉयल फिल हवा असेल तर तुम्ही चिकनकारीला पसंती देऊ शकता.**

- चिकनकारीचा इतिहास : इराणमधून भारतात आलेल्या पर्शियन लोकांकडून ही कला भारतात आली असे मानले जाते. त्याकाळात फक्त पांढऱ्या शुभ्र कापडावर रेशमाच्या धाग्याच्या साहास्याने भरतकाम केले जायचे. पुढे सतराव्या शतकात मुघलकाळात सम्राट जहांगीरची बेगम 'नूर जहाँ'हिने या कलेला राजाश्रय दिला अशी मान्यता आहे. मुघलकाळातील काही स्थापत्यकलेतही चिकनकारी आपल्याला पाहायला मिळते. आज नवाबांच्या शहरात म्हणजेच लखनौमध्ये चिकनकारीची मोठी बाजारपेठ पाहायला मिळते.
- बॉलीवूडला ही चिकनकारीची भूरळ : चिकनकारी हा प्रकार फक्त सामान्य माणसांपर्यंत मर्यादित न राहता बॉलीवूडला ही चिकनकारीची भूरळ पडलेली आपल्याला पाहायला मिळते. दीपिकापासून सोनमपर्यंत सर्वांच जणी आपल्याला चिकनकारीच्या कुर्तांमध्ये किंवा लेहग्यांमध्ये पाहायला मिळतात.
- चिकनकारीच्या कुर्ताला नवा लूक : या उन्हाळ्यात जर तुम्हाला जरा हटके लूक हवा असेल तर तुम्ही चिकनकारी कुर्तावर पट्टा घालू शकता किंवा सफेद रंगाच्या कुर्तावर रंगीत ओढणी घेऊ शकता.यामुळे तुम्हाला कुल लूक मिळू शकेल.
- चिकनकारीच्या कुर्ताला नवीन तडका : चिकनकारी फूल कुर्ता आणि डेनिम जॉकेट हा सुद्धा एक चांगला पर्याय असू शकतो. यामध्ये कुर्ताऐवजी तुम्ही वनपीस सुद्धा वापरू शकता. यामुळे तुम्हाला गरम सुद्धा होणार नाही. हा पर्याय तुम्हाला उन्हाळ्यातही कूल बनवेल.
- लेहग्यांना चिकनकारीचा साज : उन्हाळ्यात लग्न आलं तर उकाड्यात काय परिधान करायचं हा प्रश्न निर्माण होतो. या समस्येवर चिकनचा लेहंगा उत्तम पर्याय होऊ शकतो. कॉटनच्या या लेहंग्यामध्ये तुम्हाला गरम ही होणार नाही. काही दिवसांपूर्वी सारा अली खानने गुलाबी रंगचा लेहंगा परिधान केला होता. तुम्ही देखील हा पर्याय निवडू शकता.

# फॅशनसोबत तडजोड कदापि नाही....



**शॉपिंग म्हणजे कोणत्याही महिलेची आवडती गोष्ट. कुठे फिरायला जायचं म्हटलं की महिला शॉपिंग करतात आणि ज्या ठिकाणी फिरायला गेल्या तिथेसुद्धा शॉपिंग करतात. पण तुम्हाला माहित आहे का महिला कोणत्या गोष्टींवर जास्त खर्च करतात. सामान्यपणे मुलींना उच्च जीवनशैली आवडते. बाजारात सुरू असणाऱ्या ट्रेंडला फॉलो करण्याकडे त्यांचा कल असतो. मुलींना सुंदर आणि आकर्षक दिसायला आवडते. त्यामुळे त्यांच्या शॉपिंगमध्ये बऱ्याच गोष्टी या फॅशन संबंधी असतात. त्यामध्ये मेकअपचे साहित्य, वेगवेगळ्या लेडीज बॅग, महागडे दागिने यांसारख्या गोष्टींचा समावेश होतो. मुलींना त्यांच्या फॅशनसोबत तडजोड करणं अजिबात आवडत नाही. कोणत्याही परिस्थितीत त्या काळासोबत राहणं पसंत करतात. जर तुम्ही बाजारपेठांकडे लक्ष दिले तर महिला त्यांच्या आवडीच्या गोष्टी खरेदी करताना कोणतीही तडजोड करत नाहीत. सोशल मीडियावर असणारे ट्रेंड्स फॉलो करण्याकडे त्यांचा जास्त कल असतो.**



- मेकअप उत्पादने : महिलांना मेकअपबद्दल एक वेगळीच आपुलकी असते. प्रत्येक स्त्रीकडे अगदी बेसीक मेकअपची उत्पादने नक्की मिळतील. महिला त्यांच्या शॉपिंगमधली बराच भाग मेकअपच्या उत्पादनांवर खर्च करतात. सध्याचा ट्रेंड कोणता आहे त्याच प्रमाणे महागड्या ब्रँड्सच्या उत्पादनाच्या खरेदीकडे महिलांचा कल असतो. पण या उत्पादनांवर होणारा खर्च तुम्ही करु शकता. एखादा स्पेशल डे किंवा सण असेल तर अनेक साईट्सवर चांगल्या ऑफर आपल्याला पाहायला मिळतात. जर तुम्ही त्या वेळात ही उत्पादने खरेदी केली तर तुमचे खूप पैसे वाचू शकता.
- लेडीज बॅग : महिलांचा जास्त खर्च हा लेडीज बॅजवरसुद्धा होतो. वेगवेगळ्या कपड्यांवर वेगवेगळ्या रंगाच्या बॅग्ज वापरल्या जातात. त्याच प्रमाणे मेकअपचे साहित्य, पैसे, इतर गोष्टी ठेवण्यासाठी महिला वेगवेगळ्या बॅग वापरतात. त्यामुळे या प्रकारावर त्यांचा जास्त खर्च होतो.
- महागडे दागिने : सजणं कोणाला नाही आवडतं. त्यामुळेच महिलांना महागडे दागिने खरेदी करण्याची ही आवड असते. त्यांच्या शॉपिंगमधील बराच भाग हा महागडे दागिने खरेदी करण्यात जातो. त्याप्रमाणे प्रत्येक ड्रेसवर वेगवेगळे दागिने घातले जातात. त्यामुळे देखील या गोष्टीवर खूप पैसे खर्च होतात.
- पोशाख : महिलांचे कपडे हा एक चर्चेचा विषय आहे. कितीही कपडे असले तरी आपल्याकडे कपडेच नाहीत असाच विचार महिला करतात. त्यामुळे वेगवेगळ्या साइट्सवर लागणाऱ्या सेलमध्ये कपडे खरेदी करण्याचा मोह त्यांना आवरत नाही. त्यामुळे या गोष्टीवर त्यांचे खूप जास्त पैसे खर्च होतात.
- शूज : आत चांगले कपडे, दागिने घेतल्यानंतर एक परिपुर्ण लूकसाठी महिला जास्त खर्च शूज म्हणजेच पादत्राणांवर करतात. मानसशास्त्रानुसार जेव्हा आपण माणसांना पाहतो तेव्हा आपली पहिली नजर ही नकळतपणे पायांकडे जाते. म्हणनंच आपण आपल्या शूजकडे देखील लक्ष देणं महत्त्वाचं ठरतं.



## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## स्वच्छता अभियानाला गती देण्यासाठी कर्मचाऱ्यांनी पुढाकार घ्यावा -मेघना कावली

**नांदेड (प्रतिनिधी)**- गावांचा सर्वांगीण विकास आणि शाश्वत स्वच्छता ही केवळ योजनांमधून नाही, तर लोकसहभागातूनच शक्य आहे. यासाठी कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेऊन लोकचळवळ उभी करावी, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी केले.

बुधवारी नांदेड येथे स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी मयूरकुमार आंदेलवाड, नरेगा उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सखाराम खुणे, डॉ. प्रवीणकुमार घुले, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता शिंदे, समाजकल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक शुभम तेलेवार आदी उपस्थित होते.

स्वच्छता अभियानाला अधिक गती देण्यासाठी उजळणी प्रशिक्षण आवश्यक



आहे. या प्रशिक्षणामुळे कर्मचारी प्रेरित होऊन प्रभावीपणे कामाला लागतील, असा विश्वास मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविकात उपमुख्य कार्यकारी अधिकारी मयूरकुमार आंदेलवाड म्हणाले, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ हा अंतिम टप्प्यात असून, या उपक्रमास एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. या कालावधीत सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाची सर्व कामे पूर्ण करून गावे शाश्वत करण्याचे आवाहन त्यांनी केले. या प्रशिक्षणात विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड व क्षमता बांधणी तज्ज्ञ चैतन्य तांदूळकर यांनी स्वच्छता कामांची माहिती सादर केली. अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी यांनी स्वच्छता कर्मचारी लसीकरण व आरोग्य विषयावर मार्गदर्शन केले. पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सखाराम खुणे यांनी जनावरांच्या मलमूत्र व वैरण व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले. तसेच पाणी गुणवत्ता सल्लागार कपेंद्र देसाई यांनी जलप्रदूषण व स्वच्छता कर्मचाऱ्यांची भूमिका यावर सादरीकरण केले. अर्धापूर तालुक्यातील पिंपळगाव महादेव येथील ग्रामपंचायत अधिकारी एकनाथ कदम यांनी गावातील स्वच्छता उपक्रमांचे अनुभव कथन केले.

या कार्यशाळेस तालुका स्तरावरील कनिष्ठ अभियंते, आरोग्य विस्तार अधिकारी, पंचायत विस्तार अधिकारी, जिल्हा पाणी व स्वच्छता कक्षातील अधिकारी, तज्ज्ञ व सल्लागार तसेच तालुका गट समन्वयक व समूह समन्वयक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद व्यवहारे यांनी तर उपस्थितांचे आभार सुशील मानवतकर यांनी मानले.

## 'स्वाधार'चे विद्यार्थी पैशांच्या प्रतीक्षेत

**नांदेड (प्रतिनिधी)** - 'स्वाधार' योजनेसाठी २०२४ या वर्षातील तांत्रिक अडचणीत अडकलेले जिल्ह्यातील जवळपास साडेतीनशेपेक्षा जास्त विद्यार्थी आधाराच्या प्रतीक्षेत आहेत. विशेष म्हणजे या विद्यार्थ्यांना २०२५ चे पैसे मिळालेले आहेत.

इयत्ता दहावी व बारावीनंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या परंतु, समाजकल्याण विभागाच्या शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'स्वाधार' योजनेतून मदत केली जात असते. यात विद्यार्थ्यांना भोजन, निवास व्यवस्था, इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. यासाठी ४० हजारांवर वर्षाकाठी निधी दिला जातो.

दरम्यान, २०२४ या वर्षात ३५० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज केले असता सदरील अर्ज रिजेक्ट असल्याचे ऑनलाईन दाखवले जात आहे. परंतु सदरिल विद्यार्थ्यांच्या 'स्वाधार'च्या पात्र यादीत नसल्याच्या तक्रारी विद्यार्थ्यांकडून मागील एक वर्षापासून सुरू आहेत. त्यामुळे सदरील विद्यार्थ्यांचे नावे २०२४ मध्ये 'स्वाधार' योजनेत समाविष्ट झाले नाहीत. शैक्षणिक वर्ष संपले तरी २०२४ वर्षातील विद्यार्थ्यांना 'स्वाधार' योजनेच्या पैशांसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.

## चिंचोली, देवापूर शिवारात अवैध वाळू उपसा; २ कोटींचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)** -लोह्यातील चिंचोली, देवापूर शिवारात सुरू असलेल्या अवैध वाळू उपसावर उस्माननगर पोलिसांनी महसूल विभागाच्या सहकार्याने कारवाई करत तब्बल २ कोटी १० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी ७ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सहायक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार, उपनिरीक्षक गाडेकर, अंमलदार चिंचोरे, प्रकाश पेदेवाड, तुकाराम जुने आणि काही गृहरक्षक दलाचे जावान असे गोदावरी नदी पात्रातील चिंचोली ता. लोहा परिसरात भास्कर शिंदे यांच्या शेताजवळ अवैध वाळू उपसा सुरू असल्याची माहिती मिळाली. या कारवाईत महसूल विभागाचे ग्राम महसूल अधिकारी मोतीराम पवार व लक्ष्मण गोधने यांना सोबत घेऊन देवापूर शिवारात तपासणी करण्यात आली.

यावेळी आरोपींकडून मोठ्या प्रमाणात वाळू उत्खनन सुरू असल्याचे आढळून आले. या कारवाईत ७ लोखंडी फायवर बोट, ७ लहान लोखंडी इंजिन बोटी व १० ब्रास वाळू साठा असा २ कोटी १० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. जप्त केलेल्या बोटींचा पंचनामा करून त्या जिलेटिनच्या सहाय्याने नष्ट करण्यात आल्या असून, या प्रकरणी ७ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## प्रा. सु. ग. जाधव यांची आजपासून श्री साईकथा

**नांदेड (प्रतिनिधी)** - गुढीपाडवा नववर्ष प्रारंभानिमित्त प्रा. सु. ग. जाधव यांची ७ दिवसीय श्री साईकथा आयोजित करण्यात आली आहे. श्री साईमंदिर, सुंदर नगर, हनुमान गडजवळ नांदेड येथे दि. १९ ते २५ मार्च या काळात दुपारी २ ते सायंकाळी ५ या वेळात होणाऱ्या या कथेचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन साईमंदिर ट्रस्टचे उपाध्यक्ष जगदीश कोटगिरे यांनी केले आहे.

## स्वारातीम विद्यापीठात 'ताणतणाव व्यवस्थापन' विषयावर विशेष व्याख्यान

**नांदेड (प्रतिनिधी)** - संशोधन प्रक्रियेत येणारे मानसिक दडपण आणि वेगवान जीवनशैलीमुळे वाढणारा ताण यावर प्रभावी उपाय सुचविण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या नवउन्मेषण व उपक्रम विभागाच्या वतीने दि. १७ मार्च रोजी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमास संशोधक, विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या व्याख्यानासाठी विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे मानसोपचार तज्ज्ञ डॉ. उमेश उषा आत्राम हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी ताणतणावाचे शास्त्रीय विश्लेषण करत त्याचा अर्थ, स्वरूप, मेंदूतील होणारे बदल तसेच शरीरातील विविध ग्रंथींची भूमिका यावर सविस्तर प्रकाश टाकला. ताण निर्माण होण्याची कारणे, त्याचे शारीरिक व मानसिक परिणाम आणि त्याची लक्षणे ओळखण्याचे मार्ग याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. सामाजिक उदाहरणे आणि स्वतःच्या अनुभवातील यशोगाथा सांगत त्यांनी ताण व्यवस्थापनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या विविध प्रायोगिक तंत्रांची माहिती दिली.

व्याख्यानाच्या शेवटी उपस्थितांना 'आनापान' ध्यान साधनेचा प्रत्यक्ष



सराव करून घेण्यात आला. या ध्यान प्रक्रियेमुळे सहभागींत सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून दैनंदिन जीवनात या साधनेचा अवलंब करण्याची प्रेरणा मिळाली. हा उपक्रम कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन आणि कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नवउन्मेषण व उपक्रम विभागाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर यांनी डॉ. आत्राम यांचा परिचय करून दिला. यावेळी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी आणि डॉ. जी. कृष्णा चैतन्य यांच्या हस्ते डॉ. आत्राम यांचा ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास डॉ. स्मिता नायर, डॉ. वसंत साळुंखे, बालाजी भोसीकर आणि ओमकार मठपती यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जी. कृष्णा चैतन्य यांनी केले, तर डॉ. शिवाजी गायकवाड यांनी उपस्थितांचे व आयोजकांचे आभार मानले.

## 'यशवंत'द्वारे शोधचक्र पोर्टलवर राष्ट्रीय कार्यशाळा उत्साहात

**नांदेड (प्रतिनिधी)** - यशवंत महाविद्यालय आणि इन्फ्लिबनेट केंद्र, गांधीनगर, गुजरात यांच्या संयुक्त विद्यमाने 'शोधचक्र' पोर्टलवर एक दिवसीय राष्ट्रीय प्रशिक्षण व जनजागृती कार्यशाळा दि. ११ मार्च रोजी उत्साहात संपन्न झाली.

संशोधनातील सुसूत्रता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या उद्देशाने आयोजित या ऑनलाईन कार्यशाळेत देशभरातून २०० पेक्षा अधिक संशोधक, प्राध्यापक आणि ग्रंथपाल सहभागी झाले होते. कार्यशाळेचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांनी केले. अध्यक्षीय समारोपात त्यांनी नमूद केले की, आजच्या डिजिटल युगात संशोधन केवळ ग्रंथालयापुरते मर्यादित राहिलेले नाही. शोधचक्रसारखी पोर्टल्स संशोधनामध्ये पारदर्शकता आणि जागतिक दर्जा कायम ठेवण्यासाठी अनिवार्य झाली आहेत.

इन्फ्लिबनेट केंद्राचे संचालक प्रो. देविका मडाल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या सत्रात शास्त्रज्ञांच्या चमूने तांत्रिक मार्गदर्शन केले. डॉ. अभिषेक कुमार (शास्त्रज्ञ-ई) यांनी शोधचक्र पोर्टलच्या धोरणात्मक भूमिकेवर प्रकाश टाकला. नवनीत कुमार शर्मा (शास्त्रज्ञ-बी) यांनी संशोधनाच्या नोंदणीपासून ते प्रबंध सादरीकरणापर्यंतच्या टप्प्यांचे सादरीकरण केले. डॉ. सना असलम (ग्रंथालय अधिकारी) यांनी पोर्टलचा प्रत्यक्ष वापर कसा करावा, डॅशबोर्ड कसा हाताळावा आणि मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर लक्ष कसे ठेवावे, याचे थेट प्रात्यक्षिक दाखवले. कार्यशाळेचे नियोजन संयोजक सचिव ग्रंथपाल डॉ. कैलास वडजे यांनी केले. संशोधकांनी विचारलेल्या तांत्रिक शंकांचे इन्फ्लिबनेटच्या तज्ज्ञांनी निरसन केले. कार्यक्रमाचा समारोप प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. संजय नंनवरे यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ. कविता सोनकांबळे, डॉ. हरिश्चंद्र पतंगे, प्रसिद्धी समन्वयक डॉ. अजय गव्हाणे, प्रबंधक संदीप पाटील, संजय भोळे, जगन्नाथ महामुने आदींनी सहकार्य केले.

या कार्यशाळेमुळे यशवंत महाविद्यालयातील संशोधन प्रक्रिया अधिक गतीशील आणि डिजिटल होणार असून, संशोधकांना याचा मोठा लाभ मिळणार आहे. यशवंत महाविद्यालयाच्या शोधचक्र पोर्टलवर ४० संशोधक मार्गदर्शक व १५० पेक्षा जास्त विद्यार्थी सद्यस्थितीत नोंदणी करून प्रत्यक्षात वापर करत आहेत.

## पाडव्याच्या पूर्वसंध्येला 'नाफेड'चे चना हमीभाव खरेदी केंद्र सुरू

**अर्धापूर (प्रतिनिधी)** - नाफेडच्या वतीने चना हमीभावाने पाडवा पूर्वसंध्येच्या मुहूर्तावर चना खरेदी केंद्राचा शुभारंभ कृऊबाचे सचिव माणिकराव बारसे यांच्या हस्ते बुधवार, दि.१८ मार्च रोजी उपबाजार समिती अर्धापूर येथे करण्यात आला.

नाफेडच्या चना हमीभावाने खरेदी केंद्राची सुरुवात सभापती संजय देशमुख लहानकर, उपसभापती भुजंग पाटील, संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी हमाल मापाडी संचालक शिवाजी दराडे, सहकार अधिकारी लक्ष्मीकांत देशपांडे, ग्रेडर गणेश



डाकुलगे, शेतकरी केशवराव राजेगोरे, जयवंत राजेगोरे, मुस्बीर खान पठाण यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना सचिव माणिकराव बारसे म्हणाले की, नाफेडने चना खरेदीसाठी ५८७५ ह. रू क्विंटल हमीभाव दिला आहे. शेतकऱ्यांनी नाफेडला चना देण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणीसाठी चना या पिकाची नोंदणी २०२६ डिजिटल सातबारा, आधार कार्ड, आधार क्रमांकाशी जोडलेल्या मोबाईल नंबर, नाफेड द्वारा खरेदी करण्यात येणाऱ्या शेतीमालाचे पेमेंट शेतकऱ्याच्या आधार कार्ड लिंक असलेल्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे. पिकाची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने बायोमेट्रिक फिंगरप्रिंट मशीनद्वारे करण्यात येणार असल्यामुळे शेतकऱ्यांनी चना नाफेडला द्यावा, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव माणिकराव बारसे यांनी केले आहे.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने उपस्थित मान्यवर व शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. शुभारंभ यशस्वी करण्यासाठी कर्मचारी पी. एम. कानोडे, ए. एन. खान, उद्धव कदम, कोळशिकवार यांनी चना हमीभावाने खरेदी केंद्राचा शुभारंभ यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. शेतकऱ्यांनी नाफेडच्या चना हमीभावाने खरेदी केंद्राला जास्तीत जास्त चना (हरभरा) द्यावा, असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

## वासवी वनिता क्लब व न्यू वासवी आर्य वैश्य महिला मंडळातर्फे महिला दिन साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)** - येथील वासवी वनिता क्लब आणि न्यू वासवी आर्य वैश्य महिला मंडळ तरोडा खु. शाखेच्या वतीने सोमवार, दि. १६ मार्च रोजी ईरा फंक्शन हॉल येथे महिला दिन साजरा करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुरेखाताई हंबर्डे, संध्याताई कल्याणकर, वसुधाताई तगडपल्लेवार, वैशाली कोडगिरे (पातावर) उपस्थित होते. तसेच Dist V 401A चे गव्हर्नर प्रतीक चन्नावार, पूजा चन्नावार, राहुल चक्रवार, स्नेहा चक्रवार, सतीश वट्टमवार, सुनिता वट्टमवार, लता मद्रेवार, सारिका तगडपल्लेवार, कविता पबीतवार, अरुणा बंडेवार, विजया कटकमवार, सुप्रिया



मुत्तेपवार, वैष्णवी पत्तेवार, श्रेया येरावार, सविता महाजन व इतर सदस्य उपस्थित होते. सर्व प्रमुख पाहुण्यांना गुलाबाची रोपे देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी महिलांसाठी पाककला स्पर्धा, भगवद्गीता बारावा व पंधरावा अध्याय पाठांतर स्पर्धा, प्रश्नोत्तरे, मनोरंजक गेम्स आयोजित करण्यात आले होते. तसेच डॉ. कोडगिरे यांनी महिलांच्या विविध विषयांवर मोलाचे मार्गदर्शन केले. सुरेखाताई, संध्याताई, वसुधाताई यांनी देखील मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वाटप करण्यात आले. तसेच विष्णुसहस्रनाम ग्रंथांचे वाटप करण्यात आले.

वासवी वनिताच्या अध्यक्षा सुप्रिया मुत्तेपवार, न्यू वासवी महिला मंडळ तरोडा खुर्द अध्यक्ष लता मद्रेवार यांनी महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे उत्तम आयोजन केले होते.

## वसुली लिपिकाने मालमत्ता करापोटी भरलेली रक्कम हडप केल्याचा आरोप; आयुक्तांच्या कार्यवाहीकडे लक्ष

**नांदेड (प्रतिनिधी)** -नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सिडको क्षेत्रीय कार्यालयांतर्गत एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, मालमत्ता-धारकांकडून वसुली लिपिकाने मालमत्ता करापोटी दिलेली रक्कम वसुलीही केलेली पावतीही दिली. मात्र ही रक्कम महानगरपालिकेच्या खात्यात जमा न करता स्वहितासाठी वापरत हडप केल्याचा आरोप करण्यात येत आहे.

या प्रकरणी संबंधित सहायक आयुक्त यांच्याशी संपर्क साधला असता संबंधित मालमत्ताधारक यांनी भरलेली रक्कम नोंद झाली नसल्याने थकबाकी दाखविली असल्याचे सांगून टाळाटाळ करण्याचा प्रयत्न केला आहे. क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत गेल्या दोन ते तीन वर्षांत अनेक मालमत्ताधारक यांच्याकडे पावत्या मात्र नोंदी नसल्याने खळबळ उडाली असून मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी स्वतःहुन याप्रकरणी लक्ष देऊन मालमत्ताधारकांना दिलासा द्यावा व संबंधित वसुली लिपीक यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

नांदेड वाघाळा शहर मनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत गेल्या दोन वर्षांपासून एकूण २८ हजार मालमत्ता वसुलीसाठी चार कर निरीक्षक व जवळपास १५ ते १६ वसुली लिपीक कार्यरत आहेत, मात्र अनेक मालमत्ताधारक यांच्या निवासस्थानी जाऊन मालमत्ता वसुलीसाठी हे लिपीक सूट देऊन वसुली करून पावती देतात. मार्च महिन्यात नवीन निघणाऱ्या मालमत्ता करामध्ये थकबाकी दाखविल्याने अनेक मालमत्ताधारकांनी क्षेत्रीय कार्यालये येथे धाव घेतली. यातील संबंधित अनेकांची रितसर पावती व अर्ज घेऊन नोंदी घेण्यात आल्या. मात्र अजूनही



शेकडो मालमत्ताधारकांच्या मालमत्ता नोंदी बाकी असल्याने मालमत्ताधारकांनी सहायक आयुक्त यांच्याकडे घाव घेतली आहे. पूर्वी ऑनलाईन कक्ष किंवा सुविधा नसल्याने संबंधित वसुली लिपीक यांनी आपल्या पध्दतीने रक्कम जमा करत गेले परंतु यासाठी पावती फाटल्यानंतर प्रत्येक क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत दैनंदिन लेखा परीक्षण व लेखा विभागात नोंदणी असतांनाही हा सर्रास प्रकार सुरूच राहिला आहे. यापूर्वी या कार्यालयांतर्गत पावती पुस्तकामध्ये खाडाखोड, अपहर प्रकरणी एका वसुली लिपिकीस निलंबनासह तत्कालीन सहाय्यक आयुक्त बदली व ईतर कर्मचाऱ्यांना नोटीस बजावण्यात आल्या होत्या.

आता मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित वसुली कर्मचाऱ्याने नागरिकांकडून घेतलेली रक्कम स्वतःच्या वापरासाठी घेतल्याचा आरोप होत असून, हा प्रकार उघडकीस आल्यानंतर महानगरपालिकेच्या प्रशासनात खळबळ उडाली आहे. संबंधित वसुली कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी होत आहे. या घटनेमुळे मनपाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे, आयुक्त याविषयी काय कार्यवाही करतील याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com